गुरुवार, ३१ ऑगस्ट २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 31 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-33 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# सौरमोहीम : आदित्य एल-१ सज्ज

## रॉकेटची चाचणी पूर्ण : २ सप्टेंबर रोजी झेपावणार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीहरीकोटा : चांद्रयान-३ ही मोहीम यशस्वी ठरल्यानंतर भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आता सूर्यावर स्वारी करण्याच्या तयारीत आहे. इस्रो आपले यान आदित्य एल-१ हे सूर्याच्या दिशेने पाठवणार आहे. या सौरमोहिमेद्वारे इस्रो सूर्याचा अभ्यास करणार आहे. सूर्याचे तापमान, अतिनील किरणांचा पृथ्वीवर होणारा परिणाम, ओझोनचा थर, अंतराळातील हवामान, सौरवादळ आणि त्याचा पृथ्वीवर होणारा परिणाम या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी इस्रोने आदित्य एल-१ ही सौरमोहीम हाती घेतली आहे.**

या सौरमोहिमेसाठी इस्रोच्या यू. आर. राव उपग्रह केंद्रात तयार केलेला उपग्रह दोन आठवड्यांपूर्वी आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा येथील इस्रोच्या स्पेसपोर्टवर पोहोचवण्यात आला आहे. येथूनच आदित्य एल-१ हे यान अवकाशात झेपावणार आहे. २ सप्टेंबर रोजी पीएसएलव्ही या प्रक्षेपकाद्वारे हा उपग्रह सूर्याच्या दिशेने पाठवला जाईल. सकाळी ११.५० वाजता हे अवकाश यान लाँच केले जाईल. दरम्यान, या सौरमोहिमेची तयारी पूर्ण झाली असल्याचे इस्रोने सांगितले आहे. इस्रोने बुधवारी जाहीर केले की, या लाँचिंगचा सराव (तालीम) पूर्ण झाला आहे. रॉकेटची चाचणी पूर्ण झाली असून इस्रोचे यान सूर्याच्या दिशेने झेपावण्यासाठी सज्ज आहे. इस्रोने नागरिकांना आदित्य एल-१ चे प्रक्षेपण पाहण्यासाठी आमंत्रित केले आहे.

थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी https://lvg.shar.gov.in/VSCREGISTRATION/index.jsp या लिंकवर नोंदणी करावी लागेल. SDSC-SHAR, श्रीहरिकोटा येथील लॉन्च व्ह्यू गॅलरीतून हे प्रक्षेपण सर्वजण पाहू शकतात. ISRO ने यासंबंधी एक ट्वीट करत नागरिकांना प्रक्षेपण पाहण्यासाठी आमंत्रित केले आहे.



## महत्त्वाची बातमी

# तर मोदी सरकार मोफत गॅस सिलिंडर देईल : उद्धव ठाकरे


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशातील विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची तिसरी बैठक मुंबईत आयोजित केली आहे. गुरुवार ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर अशी दोन दिवस ही बैठक चालणार आहे. या बैठकीचे आयोजन महाविकास आघाडीतील पक्षांकडून केले आहे. या बैठकीची तयारी पूर्ण झाली असून 'इंडिया' आघाडीचे देशपातळीवरील नेते मुंबईत दाखल व्हायला सुरुवात झाली आहे. याच बैठकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला मविआचे प्रमुख नेते उपस्थित राहिले. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टोलेबाजी केली आहे. 'इंडिया'च्या तिसऱ्या बैठकीपूर्वीच केंद्र सरकारने २०० रुपयांनी गॅस सिलिंडरचा दर कमी केला. 'इंडिया' जसे जसे पुढे जाईल, तसे एक दिवस असा येईल, की केंद्र सरकार मोफत गॅस सिलिंडर देईल, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, मी पहिल्या बैठकीत सांगितले होते की, मी विरोधीपक्ष असा शब्द मानत नाही. आम्ही आमच्या देशाची रक्षा करण्यासाठी एकत्र आलो आहोत. भारतमातेचे रक्षण करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. हुकूमशहा आणि जुमलेबाजीला आमचा विरोधात तर आहेच. संजय राऊत यांनी जसे म्हटले की, आमची तिसरी बैठक होणार आहे. तोपर्यंतच गॅस सिलिंडरचे दर २०० रुपयांनी कमी झाले. कदाचित मला असे वाटते की, 'इंडिया' जसे जसे पुढे जाईल, तसे एक दिवस असा येईल की, आजचे सरकार गॅस सिलिंडर मोफत देईल.

# यातून देशात परिवर्तनाचे काम होईल : शरद पवार

## इंडियाची आज बैठक : २८ राजकीय पक्ष, ६३ प्रतिनिधी राहणार उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** उद्याच्या बैठकीला २८ राजकीय पक्ष आणि त्यांचे ६३ प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. विविध राज्यातून लोकांचा प्रतिसाद आहे. त्यामुळे पर्यायी मंच देशात तयार होईल. यातून देशात परिवर्तनाचे काम होईल, असे शरद पवार यांनी सांगितले आहे. मायावती या नक्की कुणाबरोबर एकत्रित जाण्याची भूमिका घेणार हे स्पष्ट झालेले नाही. काही वेळा त्यांनी भाजपसोबत जाण्याची भूमिका ठेवलेली होती. त्यामुळे त्याच्यावर आताच बोलणं योग्य ठरणार नाही, असं शरद पवार यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी इंडिया आघाडीच्या बैठकीच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक खासदार संजय राऊत यांनी केले. या पत्रकार परिषदेत काँग्रेस नेते नाना पटोले, अशोक चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी संवाद साधला. पुढे बोलताना पवार म्हणाले की, मोदी यांच्याकडून घराणेशाही आणि भ्रष्टाचारावरुन केल्या जाणाऱ्या टीकेला शरद पवार यांनी उत्तर दिले. मी पंतप्रधानांचे भोपाळचे भाषण ऐकले. त्यात त्यांनी काँग्रेसवर आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका केली. पंतप्रधानांनी राज्य सहकारी बँक, सिंचन घोटाळा याबद्दल आरोप केले होते. माझे आव्हान त्यांना आहे त्या प्रकरणाची चौकशी करा आणि देशाला काय सत्य परिस्थिती आहे ते सांगा, असे शरद पवार म्हणाले. जे सहकारी सोडून गेले त्यांना लोक मतदानाच्या वेळी जागा दाखवतील, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

अशोक चव्हाण यांनी कर्नाटकप्रमाणे मविआचे सरकार येईल असे म्हटले, उद्धव ठाकरे यांनी देशाचे स्वातंत्र्य आणि संविधान अबाधित ठेवण्यासाठी एकत्र आल्याचे सांगितले. देशातील सर्व माता भगिनींना रक्षा बंधनाच्या शुभेच्छा देतो. केवळ एक दिवसाच्या महिलांना शुभेच्छा नको. प्रत्येक दिवशी सर्व महिलांना सुरक्षित वाटायला हवे. तशी स्थिती देशात आणि राज्यात नाही, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. हिंगोलीतील भाषणात हा मुद्दा उपस्थित केला होता. भाजपने मुस्लीम महिलांकडून राखी बांधून घ्या असे म्हटले होते. त्यानुसार बिल्कीस बानो, मणिपूरच्या त्या दोन महिला आणि कुस्तीपटूंना राखी बांधा असे आवाहन केल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

# काँग्रेस खासदार अधीर रंजन चौधरी यांना मोठा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** संसदीय कामकाजात व्यत्यय आणल्याच्या आणि देशाची बदनामी केल्याच्या आरोपाखाली काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांना तीन आठवड्यांपूर्वी लोकसभेतून निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर हे प्रकरण लोकसभेच्या विशेषाधिकार समितीकडे सोपवण्यात आले होते. विशेषाधिकार समिती याप्रकरणी निर्णय घेईपर्यंत चौधरी निलंबित राहतील असे त्यावेळी सांगण्यात आले होते. दरम्यान, लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने अधीर रंजन चौधरी यांचे निलंबन रद्द केले आहे. हे निलंबन मागे घेण्याची शिफारस करणारा ठराव विशेषाधिकार समितीने मंजूर केला आहे. त्यामुळे काँग्रेस नेत्याला मोठा दिलासा मिळाला आहे. संसदीय कामकाज मंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे नेते प्रल्हाद जोशी यांनी १० ऑगस्ट रोजी संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान अधीर रंजन चौधरी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव सभागृहात मांडला होता, जो त्याच दिवशी संसदेत मान्य करण्यात आला होता. परंतु, चौधरी यांचे निलंबन आता मागे घेण्यात आले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, अधीर रंजन चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे त्यांना लोकसभेतून निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर हे प्रकरण संसदेच्या विशेषाधिकार समितीकडे सोपवण्यात आले. या विशेषाधिकार समितीने अधीर रंजन चौधरी यांना त्यांची बाजू मांडण्यास निमंत्रित केले.

# ट्रिपल इंजिनच्या सरकारकडून बळीराजा कर्जमाफीसाठी आग्रही!

## पहाटे गारवा, दुपारी कडक ऊन, रात्री चांदणं, हरवलेल्या ढगात जगाचा पोशिंदा भयभीत

आधुनिक केसरी न्यूज


सचिन कोरडे

धाराशिव : जिल्ह्यातील शेतकरी अस्मानी संकटात अडकल्यामुळे सर्व स्तरावरून शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीच्या मागणीचा जोर वाढतं आहे.शेतकरी वरुण राजाच्या अवकृपेमुळे धास्तावला आहे. जिल्ह्यात आजघडीला सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे अनेक गावागावात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील अनेक ठिकाणची तळी, विहिरी कोरडया पडल्या आहेत. पाण्याची, चाऱ्याची खूपच गंभीर स्थिती आहे. हीच बाब ध्यानात घेऊन महाराष्ट्र सरकारने दुष्काळ जाहीर करत बळीराजाला कर्जमाफी देवून दुष्काळाचे सावट घोंगवलेल्या बळीराजाला दिलासा द्यावा ,हीच मागणी जिल्ह्यातील हताश झालेल्या शेतकरी वर्गातून होत आहे. महाराष्ट्रसह मराठवाड्यातील उपजिविकेचं प्रमुख साधना म्हणजे शेती आहे. पावसाने ओढ दिल्याने खरिप पिके धोक्यात आली आहे. त्यात वाढती महागाई मुलांचं शिक्षण व कौटुंबिक खर्च भागवायचा कसा यात बळीराजा पूर्णतः हतबल झाला आहे.

तेलंगणामध्ये जशी २०१८ च्या कर्जमाफीसोबतच नव्याने १९ हजार कोटींची कर्जमाफी देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. तेलंगणातील शेतकऱ्यांच्या खात्यावरील कर्जमाफीची प्रक्रियाही सुरू करण्याची घोषणा केली आहे. तसेच के.चंद्रशेखर राव (केसीआर) 'अबकी बार,किसान सरकार' ची घोषणा देत महाराष्ट्रात धूम धडाक्यात प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) यांनी तेलंगणातील रखडलेली शेतकरी कर्जमाफी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रावरच कोरड्या दुष्काळाचे सावट आहे, वर्तमानातील खरीप आणि भविष्यातील रब्बी संकटात आहे. पाणी टंचाई, गुरांचा चारा या बाबीकडे सरकार व प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज आहे. परतीचा जरी पाऊस मराठवाडा महाराष्ट्रात झाला तरीही खरिपातील पिकाची हानी भरून येणार नाही. शेतकऱ्यांनी खरी परिस्थिती केलेला खर्च बी बियाणे खते औषधे याचा कर्जाचा डोंगर शेतकऱ्यावर कायम राहणार आहे. महाराष्ट्रात या वेगवान, गतिमान सरकारच्या करोडोच्या जाहिराती वरील खर्च थांबवत ती जाहिरात नसून शेतकऱ्यांसाठी स्थापित झालेले, वेगवान सरकार आहे असे, 'महाराष्ट्रात तर स्थापन झालेले हे सरकार शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या हितासाठीच स्थापित केलेले ट्रिपल इंजिनच सरकार आहे.' असे सध्याच्या सरकारमधील मंत्र्यांमधून बोलले जात आहे. त्यामुळे या वेगवान सरकारने दुष्काळाच्या गर्द छायेत अडकलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा वेगवान निर्णय लवकरात लवकर घ्यावा, अशी मागणी सर्वसामान्य शेतकऱ्यांमधून होऊ लागली आहे.



## उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या संदर्भात आणखी एक प्रश्न विचारतो. बघा, कोणाला सांगता येतं का ? या यानातून प्रवास करणारे आणि चंद्रभूमीवर पाऊल ठेवणारे अंतराळवीर कोण ? मी सांगतो, ' राजेश म्हणाला. ' सर, नील आर्मस्ट्रॉंग आणि एडविन आल्ड्रिन यांनी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. ' ' अगदी बरोबर,' डॉ. राव म्हणाले. ' आणि या यानाला लुनार मोड्युल असे म्हणत. नंतर २००३ साली चीनने चंद्रावर यशस्वी पाऊल ठेवले आणि मग भारताला आपणही चंद्रयान मोहीम हाती घ्यावीशी वाटू लागली. तशी ती या[आपण घेतली सुद्धा ! आणि त्यानंतर फक्त पाच वर्षातच आपले चंद्रयान १ यशस्वीरीत्या चंद्रावर गेले. या यानाने आपली कामगिरी चोख बजावली बरं का ! जवळपास वर्षभर त्याने चंद्राच्या पृष्ठभूमीवरची विविध प्रकारची माहिती आपल्याला पाठवली. ही गोष्ट आहे २००८ मधली. याच वर्षात आपल्या देशाने ११ उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले आणि त्यातील १० उपग्रह हे एकाच प्रक्षेपकाने म्हणजे रॉकेटने अंतराळात सोडले. ' डॉ राव बोलतच होते. सगळे लक्षपूर्वक ऐकत होते. त्या आधी ५ ऑगस्ट १९६९ रोजी भारतीय अवकाश संशोधन संस्थेची म्हणजेच इस्त्रोची स्थापना करण्यात आली होती. २४ सप्टेंबर २०१४ रोजी आपले मंगळयान मंगळ ग्रहाच्या कक्षेत स्थिरावले. या पहिल्याच प्रयत्नात आपण यश प्राप्त केले आणि असे करणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला. ' याचा अर्थ तुमच्या लक्षात आला का ? भारताने असे रॉकेट विकसित केले की जे वेगवेगळे उपग्रह अंतराळात सोडण्यासाठी उपयोगी पडतील. त्याला म्हणतात ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक वाहन म्हणजे इंग्रजीत ज्याला म्हणतात पोलर सॅटेलाईट लाँच व्हेईकल अर्थात पी एस एल व्ही. या पी एस एल व्ही ने इस्त्रोच्या मुकुटात मानाचा तुरा खोवला. २००८ मध्ये या एकाच वेळी दहा उपग्रहांचे प्रक्षेपण केले गेले. शास्त्रंज्ञांचे हे फार मोठे यश होते. यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारताच्या अंतराळ मोहिमांचा खर्च खूप कमी व्हायला मदत झाली. त्याशिवाय भारताने आपल्या उपग्रहांसोबतच इतर देशांचेही उपग्रह प्रक्षेपण करून परकीय चलनही प्राप्त केले.आतापर्यंत १९ भारतीय तर २२ विदेशी असे ४१ भूस्थिर उपग्रह इस्त्रोने अवकाशात यशस्वी रित्या पाठवले आहेत. पी.एस.एल.व्ही.च्या एका उड्डाणाचा खर्च साधारण १.७ करोड अमेरिकन डॉलर इतका आहे.त्यानंतर भूस्थिर उपग्रह प्रक्षेपक यान अर्थात जी एस एल व्ही म्हणजे जिओसिंक्रोनस सॅटेलाईट लाँच व्हेईकल आपण साधारणपणे इ.स. २००० मध्ये आपण विकसित केले.



## समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

### पैशाबरोबरच नाती देखील जपावीत

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अत्याधुनिकीकरण आणि काही प्रमाणात अंधानुकरण यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले असल्याचे समजले जाते. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे ह्या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणे सुद्धा पुरेसे नसून आकर्षक दिसणे आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यकच असते. यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्यासाठी काहीजणांचा कल असतो. त्यामुळे सुंदर आणि आकर्षक राहणीमानासाठी निश्चितच आर्थिकदृष्ट्या काही तरतूद करणे अनिवार्य असते. ह्या राहणीमानाची नुसती सवय होऊन चालत नाही, तर असे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार खर्चही करावा लागणे स्वाभाविक असते. एका दिवसाची सुंदरता ही कदाचित खिशाला परवडेल देखील, परंतू ती वर्षानुवर्षे टिकवणे निश्चितच खर्चिक ठरते. त्यासाठी अर्थकारण समजून घेऊन आपल्या उणिवा दूर करणे क्रमप्राप्त ठरते. आपल्याला आपल्या स्वतःच्या धनाविषयी असलेले प्रेम आणि त्यामुळेच निर्माण झालेले आपल्या पैशाबरोबरचे नाते अतूट असते. आपण शरीराने आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपले धन आणि आपले घर हे घर करून राहीलेले असते. ही घरघर प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते. आपले मन आणि धन एकाच ण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातील धन आणि धनाढ्य मन, तसेच मनातील घर आणि घरातील मन ह्या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत.



आधुनिक केसरी

**थांबे रडारड | जन्माची ह्या ||**
फुंदु फुंदु रडे | आत्मा सोडी घरा ||
देहाचा पसारा | नश्वरांचा ||१||
न स्मरे ईश्वरा | वाया जन्म गेला ||
मायेशी भुलला | मुढ कैसा ? ||२||
संतवाणी कधी | नाही तू ऐकली ||
अवदसा आली | भाळी तुझ्या ||३||
किर्तन भजन | श्रवण पुण्याचे ||
द्वार ते मोक्षाचे | जाणले ना ||४||
खेळात रंगावी | पंढरी फुगडी ||
थांबे रडारडी | जन्माची ह्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

मङ्गला मधुरा चास्तां वाणी मे मङ्गले शिवे |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७९ || हे मंगले, शिवे, माझी वाणी पवित्र आणि मधुर असावी. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ब्रह्मविद्या घट संचरे, जगी पुरातन प्रीति ।
निर्मल प्रेम प्रवाह में, बनी सनातन नीति
।।४३।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/४३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्येच्या शरीरात प्रगट होण्याने आत्म्याची अनादि काळाची चेतन भक्ती जागृत होते आणि त्या पवित्र प्रेम प्रवाहात चेतन आत्म्याचा चेतन आनंद व्यवहार होऊ लागतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४२वे

गृहस्थ कर्तव्यात श्रीमहाराज ना चुकती
सगळी कार्ये जबाबदारीने पार पाडीती
असता गोंदवल्यास, प्रवासा जाऊन येती
इंदुरास मुक्कामी असतांना ,इकडे घरी ।।
वडील रावजी वैकुंठासी गमन करिती
महाराज वडिलांची उत्तरक्रिया करिती
माय गीताबाईचे दुःखास हलके करिती
दुसऱ्या लग्नास माय त्यांना राजी करिती ।।
आटपाडीच्या सखाराम देशपांडे कडे गेले
त्यांच्या नेत्रहीन कन्येशी लग्न करून आले
ही तुझी सुनबाई आपल्या आईला म्हणाले
पुढे काही दिवस गोंदवल्यास ते राहिले ।।
धाकटा बंधू-अण्णा ,नि भगिनी-मुक्ताबाई
दोन्ही मुलांच्या निधनाचे अपार दुःख ते
माय गीताबाईला सहन करावे लागले
महाराजानी शांतपणे हे ही सारे सोसले ।।
गोंदवल्याच्या आजूबाजूला भ्रमंती असे
बैरागी वेषात महाराज भक्तांना बोलतसे
घ्यावे तुम्ही "रामनाम " सदा मनापासून हो
रामराया रक्षण सदा तुमचे करीत असे ।।
रामनामाची गोडी, मनास लागली
कवी-अरुणदासाची लेखणी रंगली




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## उत्सवामध्ये भगवंताचे प्रेम हाच मुख्य भाग आहे

आधुनिक केसरी

उत्सवासाठी तुम्हा सर्वांना बरेच कष्ट् झाले. लग्नामध्ये खऱ्या विवाहविधीला, म्हणजे अंतरपाट धरून सप्तपदी होईपर्यंत, थोडाच वेळ लागतो; पण या संस्काराचे महत्व आणि गांभीर्य मनावर ठसावे म्हणून चार दिवस एवढे सोहळे करतात. त्याचप्रमाणे, उत्सवामध्ये भगवंताचे प्रेम हे मुख्य आहे बाकी आनंद आणि उत्साह हे त्याला पोषक म्हणून असावेत. आपला प्रत्येक सण आपल्याला भगवंताची आठवण करून देण्यासाठी आहे. देवदेवतांच्या उत्सवाचा हेतूही भगवंताचे प्रेम वाढीला लागावे हाच आहे. दिवाळीमध्ये फटाके उडवणे, गोड खाणे, फराळ करणे, या सर्व गोष्टी मागचे दुःख विसरण्यासाठी म्हणून आहेत. उत्सव काय, सण काय, धार्मिक कृत्ये काय, तीर्थक्षेत्रे, पूजापठण, इत्यादि सर्वांचे कार्य भगवंताचे प्रेम मिळवणे हेच मुख्यतः आहे. आपल्या हातून घडणारे प्रत्येक कर्म भगवंताच्या कृपेने होते आहे ही भावना निर्माण झाली पाहिजे, म्हणजे हवे नकोपण नाहीसे होऊन, त्याच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न होईल. देवाचे प्रेम यायला त्याची भीती गेली पाहिजे. आपण भुताखेतांवर आपला विश्वास नाही असे म्हणतो; पण करणी केलेला कुणी माणूस भेटला असताना किंवा पछाडलेला माणूस बघितल्यावर, आपल्याला त्याची भीती उत्पन्न होते. जी भीती आपल्याला भुताखेतांची वाटते तीच देवाबद्दल वाटली तर आपल्याला प्रेम कसे उत्पन्न होणार ? तेव्हा देवाबद्दलची भीती मनातून काढून टाका. देव कधीही कोणाचे वाईट करणार नाही याची खात्री बाळगा. परमेश्वर दयेचा सागर आहे. आपल्या बाळाला दुःख व्हावे असे माउलीला कधी वाटेल का ? आपण तिला मनापासून हाकच मारीत नाही.



भगवंताचे नाम मनापासून घेतच नाही; इथेच आपले सर्व चुकते. तेव्हा, गोंदवल्यास आल्यासारखे, रामाजवळ जाऊन आता तुम्ही एकच मागा, 'रामा, तुझे प्रेम आम्हाला दे.' तुम्ही मागाल ते तो तुम्हाला खात्रीने देईल ह्यावर विश्वास ठेवा. तो त्याच्यासाठीच इथे उभा आहे. रामाची भक्ती करण्याने, आपला संसार आपली कल्पनाही होणार नाही इतका सुखाचा होईल. कोणत्याही परिस्थितीत नामाला सोडू नका. भगवंताच्या नामानेच त्याचा सहवास घडेल आणि त्याचे प्रेम उत्पन्न होईल. नाम हे भगवंताला अत्यंत जवळचे आहे. या नामाची तुम्ही संगत धरा, त्याचा सतत सहवास ठेवा, त्याला प्राणापलीकडे जपा; मग हेच नाम तुम्हाला थेट भगवंतापर्यंत पोहोचविल्याशिवाय राहणार नाही. जिथे राम तिथे नाम, आणि नाम तिथे राम. खरोखर तुम्ही नामात दंग होऊन स्वतःला विसरा, मग राम तुमच्यापुढेच उभा आहे.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

आणि शेवटी आता असे वाटू लागले आहे कि या देह रुपी रथाच्या घोड्याचे लगाम कोणा तरी सर्व सामर्थ्यवान चालकाच्या हाती सोपवल्या शिवाय हा रथ समर्थपणे मार्गक्रमण करणार नाही .असे व या शिवाय अनेक प्रश्नांचे काहूर मनात उठल्या शिवाय खरा आनंद काय ते समजत नाही. एकदा एकाला आनंदाचे कारण विचारले. तो म्हणतो, आता मला आनंदाशिवाय काही उरलेच नाही. कारण मी आणि माझे गुरु यातील अंतर कमी झाले मला एकदाचे गुरू भेटले! ही खरी गुरुभेट! ! ! त्यामुळे गुरु केला असे न म्हणता मी शिष्य झालो हे वाटणे जास्त संयुक्तिक आहे. मी जर स्वतःला सद्गुरूचा शिष्य म्हणवितो , तर त्याना आवडते तसे मी वागले पाहिजे. आणि त्याना नाम आणि सदाचार फार आवडतो! जिथे तुम्ही राहता तिथे सद्गुरु आहेतच असे तुम्हाला वाटते आणि समाधान होते, हीच त्यांची खरी कृपा होय. श्रद्धेने जे काम होते ते तपश्चर्येने होत नाही.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

यौवनं धनसम्पत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ॥सरलार्थ – तारुण्य, श्रीमंती, सत्ता (आणि) अविवेक, यांतली एकेक गोष्ट सुद्धा अनर्थाला कारणीभूत होते. (मग) चारी गोष्टी जर एकत्र आल्या, तर काय काय अनर्थ होतील ते कोणी सांगावे ? स्पष्टीकरण – तारुण्य ही उन्मादाची अवस्था असते. तिच्यातून कळत न कळत अनेक भानगडी निर्माण होतात. श्रीमंतीच्या सोन्यातही माणूस अनेक अनर्थांना निमंत्रण देतो. हाती असलेल्या सत्तेने माणूस अनेक लोकांना पीडा देऊ शकतो आणि शेवटी अविवेक. हा अविवेक आपल्या आणि दुसऱ्याच्या आयुष्यातही अनर्थं निर्माण करू शकतो. मग या चारी गोष्टी जर एकत्र आल्या तर कोणाचे काय घडेल, ते सांगणे कठिण ! शेवटी सर्व गोष्टींवर विवेकाचा अंकुश ठेवला पाहिजे, हे याचे तात्पर्य !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# मेहनतीची तयारी ठेवून तरुणांनी राजकारणात यावे : खा. हेमंत गोडसे

## स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेला नाशिक येथे उत्स्फूर्त प्रतिसाद





आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक : राजकारण हा काटेरी मुकुट आहे, इथे मान सन्मान असला तरी सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांचे ओझे मोठे आहे, ते पेलण्यासाठी दिवसरात्र मेहनत करण्याची तयारी ठेवून तरुणांनी राजकारणाच्या क्षेत्रात पाऊल टाकावे, असे प्रतिपादन नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने, दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे तेरावे पुष्प गुंफतांना राजकारणाचे बदलते स्वरूप आणि वास्तव या विषयावर ते बोलत होते.**

दि. 29 ऑगस्ट रोजी लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात, क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे सहसचिव ॲड. तानाजी जायभावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास चंद्रात्रे, नाशिक जिल्हा पत्रकार संघाचे शहर जिल्हाध्यक्ष दिलीप के. कोठावदे, राजस्थानी मल्टिस्टेट बँकेचे विभागीय व्यवस्थापक राधेश्याम झंवर, राजस्थानी मल्टिस्टेट बँकेचे नाशिक शाखेचे मुख्य सल्लागार संतोष मुंदडा, डॉ. प्रभू गोरे, संजय व्यापारी, संदीप घंटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना खा. हेमंत गोडसे म्हणाले की, सद्यस्थितीत राजकारण अतिशय गढूळ झाल्याचा आरोप केला जातो, राजकीय क्षेत्रावर असे आरोप पूर्वीही होत होते, आजही होतात आणि पुढेही होत राहतील, कारण सगळ्याच बाबतीत कालानुरूप बदल होत असतात तसेच ते राजकारणातही होत आहेत, या बदलांची तीव्रता कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. अलीकडच्या काळात सोशल मीडियासारखे माध्यम बलशाली झाल्याने या बदलांची तीव्रता तत्काळ दिसून येत आहे. तथापी समाजसेवेची आवड, सेवाभाव आणि स्वतःच्या अडचणी, त्रासांचा विचार न करता अहोरात्र परिश्रम करण्याची तयारी व क्षमता स्वतःमध्ये असतील तर तरुण-तरुणींनी राजकारणात सक्रिय व्हावे, असे आवाहनही खा. गोडसे यांनी केले. यावेळी त्यांनी आपण राजकारणात कसे आलो या विषयीचे मजेदार किस्से आणि राजकारणात आल्यावर आलेले खुमासदार अनुभवही सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना ॲड.तानाजी जायभावे यांनी वीस वर्षांपूर्वीचे राजकारण आणि आताचे राजकारण यातील तफावत स्पष्ट करताना सद्यस्थितीत राजकारण आणि अर्थकारण एकमेकांच्या हातात हात घालून वावरत असल्याने तत्वनिष्ठ राजकारणाला थारा राहिला नसल्याचे शल्य व्यक्त केले. त्याचबरोबर समाजहिताची भावना मनात असेल आणि काम करण्याची तयारी असेल तर सत्तापदे नसली तरीही राजकारण करता येते, याविषयीचे स्वानुभव कथन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे यांनी तर आभार प्रदर्शन व्याख्यानाचे आयोजक दिलीप के. कोठावदे यांनी केले.



# मूकबधिरांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारत स्काउट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालयाच्या वतीने मूकबधिर निवासी विद्यालय, चंद्रपूर येथे रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी शिक्षणाधिकारी (प्राथ.) तथा जिल्हा मुख्य आयुक्त स्काऊट गाईड राजकुमार हिवरे, शिक्षणाधिकारी (माध्य.) तथा जिल्हा आयुक्त (गाईड) कल्पना चव्हाण यांच्यासह जिल्हा संघटक चंद्रकांत भगत, गाईड कॅप्टन रंजना किन्नाके, निशा दडमल, मूकबधिर निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक बलकी, कावळे, कानकाटे व मिथुन किन्नाके आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमात जिल्हा संघटन आयुक्त(स्काऊट) चंद्रकांत भगत व रंजना किन्नाके यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व तसेच कब बुलबुल व स्काऊट गाईड चळवळीच्या माध्यमातून विविध सण-समारंभ साजरे केले जातात.

याबाबत शालेय विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमात भवानजीभाई चव्हाण हायस्कूल येथील गाईडने सहभाग घेतला. यावेळी उपस्थित गाईडने मूकबधिर निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधनाच्या कार्यक्रम साजरा केला.





# व्हिडिओ, ऑडियोच्या निगराणीत ग्रामसभा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे लोणी येथील ग्रामपंचायतची ग्रामसभा महिला सरपंच गुलशन बी. सत्तार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर ग्रामसभा व्हिडियो व ऑडियो च्या निगराणीत घेण्यात आली. सभा दरम्यान विविध विषया वर चर्चा करुन सर्वानूमताने ठराव घेण्यात आले. यात रमाईआवास घरकूल योजना यात गरजू लोकांचे नाव समावीष्ट करण्यात आले. वन प्राण्यामुळे होत असलेली शेतीमाल नुकसानीबाबत वनविभागाला ठराव पाठवुन बंदोबस्त करण्याचा ठराव घेण्यात आला. गुरेढोरे असलेल्या शेतकऱ्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजना यातून गुरांचे गोठे घेण्यासाठी गुंरे धारकांचे नावे घेऊन ठरावात घेण्यात आले. विविध विषयांवर चर्चा कण्यात आली. ग्राम सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी उप सरपंच पूष्पा बळीराम दांडेकर भाजपा अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तथा तंटामुक्त अध्यक्ष सत्तार शब्बीर पटेल माजी उप सरपंच सत्तार सूभान पटेल ग्राम विकास अधिकारी प्रशांत वाघमारे ग्राम पंचायत सदस्य मोईन पटेल कैसर पटेल बानोबी गूलाबनबी पटेल ईद्रीस पटेल संतोश दांडेकर ज्ञानेश्वर दांडेकर इंदुबाई गायकवाड मूख्यध्यापक वाघमारे सर खलील पटेल गूलाबनबी पटेल ईसाक पटेल जूबेर यूनस पटेल शीपाई अंकूशजाधव सचीन अहीरे यांच्या सह गावातील नागरिक व तरूण मोठ्या संखेने उपस्थित होते.

# वंचित कुणीकडे

आधुनिक केसरी

शिवसेनेत फूट पडल्यानंतर महाराष्ट्रातले उद्धव ठाकरे यांचे महाविकास आघाडीचं सरकार कोसळले. त्यानंतर काही महिन्यांनी उद्धव ठाकरे यांच्या ठाकरे गटाची आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीशी युती झाली. दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी २३ जानेवारी २०२३ रोजी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन या युतीची घोषणा केली. उद्धव ठाकरे यांची प्रकाश आंबेडकरांबरोबर युती असली तरी त्यांचा पक्ष महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशात इंडिया आघाडीबरोबर आहे. परंतु, प्रकाश आंबेडकर हे मात्र मविआ आणि इंडिया आघाडीपासून अलिप्त आहेत. त्यामुळे ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीबाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, इंडिया आघाडीची गुरुवार व शुक्रवारी (३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर) मुबईत महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीला देशभरातील २८ पक्षांचे नेते, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री हजेरी लावणार आहेत. महाविकास आघाडी या बैठकीचे आयोजन करत आहे. मुंबईतल्या ग्रँड हयात या हॉटेलमध्ये ही बैठक होणार आहे. या बैठकीच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचित केली. या पत्रकार परिषदेला ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे आमदार अशोक चव्हाण, आमदार नाना पटोले, आमदार आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, आमदार जयंत पाटील उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारण्यात आला की प्रकाश आंबेडकरांबरोबर ठाकरे गटाची युती आहे. परंतु, प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे की त्यांना महाविकास आघाडीचे किंवा इंडिया आघाडीच्या बैठकीचे निमंत्रण नाही, त्यामुळे वंचित बहुजन आघाडी आणि ठाकरे गटाची युती आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यावर काय सांगाल? या प्रश्नावर उद्धव ठाकरे म्हणाले, प्रकाश आंबेडकर यांच्याशी व्यवस्थित चर्चा करून याबाबत निर्णय घेतला जाईल. उद्धव ठाकरे म्हणाले, आमची (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीशी युती आहे. ही युती आम्ही २३ जानेवारीला जाहीर केली आहे. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. शिवसेना आणि प्रकाश आंबेडकरांनी युती केली आहे. परंतु, इंडिया आघाडीत किंवा महाविकास आघाडीत येण्याची त्यांची इच्छा आहे का हे आम्हाला प्रकाश आंबेडकरांना विचारावे लागेल. त्यांच्याशी चर्चा करावी लागेल. कोणतेही पक्ष एकत्र आल्यानंतर एकमेकांपासून वेगळे होण्यासाठी युती होत नाही. प्रकाश आंबेडकरांशी व्यवस्थित चर्चा करून पुढचा निर्णय घेतला जाईल. जर त्यांची तयारी असेल तर तेसुद्धा महाराष्ट्रात महाविकास आघाडीत आणि देशात इंडिया आघाडीत येऊ शकतात.

# संविधानानं नेमकं यांचं काय बिघडवलं ?

आधुनिक केसरी



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

**ते पूर्वी घडलं होतं. आता हे घडत नाही. आता बदल झाला. जूने विषय काढून उपयोग काय?.असं म्हणून जुन्या चुकीच्या गोष्टींना चर्चा करण्यापासुन टाळले जाते. हो टाळलं सुध्दा पाहिजे. परंतु हे का बदलले, तर देशात अस्तित्वात असलेल्या संविधाना मुळेच ना..! हे तेच संविधान आहे की,ज्या संविधानाने व्यक्त होण्याचे व्यक्ती स्वातंत्र्य मिळवून दिलं.ह्याच संविधानाच्या विरोधात बोललं गेलं तरी संरक्षण सुध्दा हेच संविधान मिळवून देते.व्यक्ती स्वातंत्र्याने संविधानाच्या विरोधात धाडसाने बोलण्याचं स्वातंत्र्य दिलं आहे. असेच म्हणावे लागेल. कारण संविधानाच्या विरोधात बोलण्यासाठी अनेक जीभा संविधानाचाच द्वेष करत आहेत. जेण् संविधान व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य देते.**

त्या संविधाना बाबत असा द्वेष पाहायला मिळणार असेल तर ह्या व्यक्तीकडुन स्वातंत्र्याचा होत असलेला हा सदुपयोग म्हणायचा की दुरुपयोग? परंतु जे संविधानाच्याच विरोधात संविधान बदलाची भाषा बोलू लागलेत त्यांना मात्र संविधानाने नक्की काय दिले. याची जाणीव सुद्धा करून देणे आवश्यक आहे. मुळातच संविधानाच्या विरोधात कितीही कटकारस्थाने केली तरी संविधान जे हक्क अधिकार देत आहे. ते तर देतच राहणार.ते प्रामाणिक आहे. ते त्याचे काम करत आहे. संविधानाची अंमलबजावणी करणारे किती ही नालायक ठरले तरी संविधानाचा आधार घेऊनच सर्व काही कार्यवाही करावीच लागत असते. संविधानाचा किती ही द्वेष केला तरी संविधानच सर्वश्रेष्ठ ठरते. कारण ते सर्वसमावेशक आहे.आपला हा जो देश असा आहे की, ज्या देशात पतीच्या निधनानंतर पत्नीला पतीच्याच चितेवर ढकलुन जाळलं जायचं.धर्माने तिला जगण्याचा अधिकार नाकारलेला होता.तिचे जीवन सुद्धा तिच्याच पती सोबत संपविणारी सती नावाची अनिष्ट प्रथा पूर्वी देशात अस्तित्वात होती. इ.स.१८२९ साली लॉर्ड विल्यम बेंटिक ने या प्रथेला ब्रेक दिला.शेवटी कायदा कानून याच्या कचाट्यात यासारख्या अनेक धार्मिक अनिष्ट रूढी परंपरा,प्रथा अडकल्या.आजही आपल्या देशात मानसिक व छळवाद करणाऱ्या अनेक अघोरी प्रथा आहेत की त्यास पायबंद घालण्यासाठी संविधानच ऊपयुक्त ठरते. संविधानाचा कायदा हा प्रत्येक घटकाला न्याय देणारा आहे.परंतु देशात विकृत मानसिकतेच्या अनेक विकृती ह्या द्वेष पसरवून सामाजिक वातावरण बिघडवण्यासाठी,अन्याय करण्यासाठीच अनेक धार्मिक संघटनातून काम करत असतात.ज्या देशात धर्माने स्त्री ला जिवंत जाळून मारलं जायचं त्याच देशात आज संविधान स्त्रीला संरक्षण मिळवून देणारं सुरक्षा कवच बनलं आहे. स्त्री ला जाळणाऱ्या मनोवृत्ती ह्या देशात आहेत.त्याच प्रमाणे संविधानाचा द्वेष करत संविधान जाळणारी विकृती सुद्धा आपल्याला पाहायला मिळाली.हजारो वर्षांची गुलामगिरी, अस्पृश्यता नष्ट करण्याचं काम ह्या संविधानाने केलेले आहे. संविधानाचा द्वेष केल्याने,संविधान जाळलं गेल्याने संविधानातील नागरीकांचे हक्क आणि अधिकार संपुष्टात आले का? तर अजिबात नाही.परंतु हे हक्क आणि अधिकार संपुष्टात आणण्यासाठी जी संविधान विरोधी भूमिका घेतली जात आहे. ती मात्र संविधानाच्या दृष्टीने धोकादायक बनली आहे. संविधान तर सर्वांना न्यायिक दृष्टीकोनातून पाहत आहे.परंतु संविधाना कडे काहींचा म्हणजेच धर्माचे ठेकेदार बनलेल्या काही लोकांचा बघण्याचा दृष्टीकोण हा संकुचित आणि संविधानद्वेषी असाच राहिलेला आहे.ते फक्त आमचा धर्मच महत्वाचे असल्याचे सांगत राहतात. यात अनेक धर्मचिकित्सक असलेली कट्टर धर्मीय लोकं धर्माचच श्रेष्ठत्व सांगत असतात.ते सांगण्या बद्दल काहीच हरकत नाही.परंतु संविधानाचा द्वेष का? जे संविधान धर्मनिरपेक्षतेची शिकवण देत आहे.सर्व धर्मांना संरक्षण देत आहे.त्याच संविधानाला धर्माकडुन बगल दिली जात आहे.तेच संविधान धोक्यात आणले जात आहे.धर्माच्याच श्रेष्ठत्वाने संविधान सुरक्षित राहिलेले नाही.संविधानास धर्म अजून किती आव्हाने देणार आहे ? असा सवाल धर्मनिरपेक्ष समजलेल्या संविधाना साठी विचारावाच लागेल.कारण संविधानाला उघडपणे चॅलेंज देण्याचे आव्हान धर्मच देऊ लागला आहे.भारत देशाची ओळख धर्माने होण्यासाठी देश पातळीवर धार्मिक संघटन होऊ लागले आहे.धर्म खतरे मे है,असं म्हटलं जातं.परंतु हे असं मुळीच नाही.उलट धर्मामुळेच संविधान खतरे मैं हैं असे म्हणणे योग्य ठरेल.धार्मिक वाद निर्माण केला जात आहे.जातीय दंगली घडवून आणल्या जात आहेत.हे काम संविधान नव्हे तर नसा नसात भिनलेली जातीय आणि धार्मिक द्वेष करणाऱ्या मानसिकतेची लोकं करत आहेत. खरतर संविधानाला बळकटी देणं धर्माचीच जबाबदारी आहे. परंतु संविधानाला खिळखिळे करण्याचेच काम धर्म करत असल्याने संविधानाला खरा धोका हा धार्मिक कारणच बनलेले आहे. संविधानाने सर्व धर्मांना किंवा धर्मातील अनुयायांना स्व-धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचा अधिकार हा मिळवून दिलाच आहे.तो अधिकार धर्माने नक्की बजवावा.परंतू धर्मच जर संविधानाच्या गाभ्याला हात लावत असेल,संविधानाहून श्रेष्ठ समजत असलेली धर्माची धार्मिकता ही कट्टरवादच दाखवून देत असेल तर हे संविधान धर्मापासून वाचविण्याची व स्वतःला फक्त भारतीय समजणाऱ्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असणार आहे.संविधान आपल्याला काय देत आहे. हे संविधान पूर्णपणे समजत आहे,परंतु समजून न घेण्याची व त्या नुसार मार्गक्रमण न करण्याची ही मनोवृत्ती संविधान बदलाची भूमिका प्रत्यक्ष कृतीत आणण्यास मदत करणारी आहे.संविधानाच्या विरोधात जाणाऱ्या ह्या लोकांचं नेमकं संविधानानं काय बिघडवलय? हेच समजेना झालं आहे. संविधान विरोधी भूमिका घेत संविधान बदलाची भाषा करण्याची का गरज वाटू लागली आहे ? असं काय बिघडलय की संविधान असल्याने नुकसान होऊ लागलं आहे का ? धर्मा नुसार हा देश चालला पाहिजे का? संविधानाने जे दिलं तेच अधिकार धर्म देण्यासाठी सज्ज झालेला आहे का? म्हणून संविधान बदल हवा आहे का?देशात धर्माची मनमानी दिसून आली.धर्मामूळे अन्यायाचे व्रण उमटलेले दिसतात.पण संविधान कधीच स्वतःची मनमानी करत नाही.संविधानात फक्त समता,बंधुता,न्याय यांसारख्या अनेक मानवतावादी मूल्यांची मोहरच उमटते. संविधान बदलाची भाषा करता येते.हेच तर संविधानाने व्यक्त होण्याचं महत्वपूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे.संविधान किती महान आहे.हे यावरूनच ते समजते अन ते समजून घ्यायलाच हवे.जे व्यक्त होता येतंय,संविधानाने दिलेल्या त्या व्यक्तीना स्वातंत्र्याच मोल अजिबात कळेना झाले आहे.व्यक्त होणारी हीच भाषा पूर्णपणे संविधानाच्याच विरोधात जाऊ लागली आहे. संविधान मानणाऱ्या अन न मानणाऱ्या लोकांच्यात वैचारिक मतांचे संघर्ष मात्र उभे राहिलेले आहेत. कालानुरूप संविधानातील घटना दुरुस्ती वारंवार होतच आहे. त्यामुळे नव नवीन कायद्यांची भर सुद्धा पडतच आहे. परंतु संविधान बदलासाठी ज्या हालचाली घडतांना दिसत आहे.त्या मात्र धोक्याची घंटाच देऊन जात आहेत.संविधान अपमानित करून हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा घाट घातला जात आहे.संविधानाने लोकशाहीला जन्म दिला.परंतू संविधानच डेथ करण्यासाठी ह्याच लोकशाहीच्या संविधानाचे बोट पकडुन डाव टाकला जात आहे.संविधानाने भारतीय नागरिकास सर्व काही देण्याचा जबाबदारी पूर्वक प्रयत्न केलेला आहे. संविधानाची अंमलबजावणी व्यवस्थित न करणारे हेच राज्यकर्ते व काही प्रशासकीय अधिकाऱ्यांमुळेच संविधानाची मजबुती होऊ शकली नाही. संविधानाचा अपमान होतो तेव्हा कुणीच बोलायला तयार होत नाही. ज्या संविधानाने सगळेच हक्क आणि अधिकार मिळवून दिले ते संविधान ह्या देशात नको अशी वातावरण निर्मित धार्मिक रंगातून केली जात असल्याने धर्मानेच नेहमी भांडणे लावली आहेत. एकमेकांच्या विरोधात लढविले गेले आहे. परंतू ह्याच धर्मांना अभय देण्याचं काम संविधानाने केलेले आहे. मग संविधान वाचविण्यासाठी धर्म स्वतःच्या खांद्यावर जबाबदारी घेणार आहे का? संविधानाने सुरक्षितता मिळवून दिली आहे.परंतु संविधानाशी प्रामाणिकता, निष्ठा जपली जात आहे का ? तर अजिबातच नाही.जे कुणी संविधान विरोधी भूमिका घेतात, अशांना किती ही संविधान समजून सांगितले तरी ते संविधान अजिबातच समजून घेणार नाहीत. त्यामुळे संविधानाच्या समर्थनार्थ संविधानाच्या रक्षणासाठी उतरण्याची आवश्यकता आहे. पूर्वी जे अधिकार नाकारले. तेच अधिकार संविधान भारतीय नागरिकांना देत आहे. परंतू ह्याच संविधानाच्या अस्तित्वाला धक्का दिला जात आहे. स्वातंत्र्याप्रमाणे जगण्याचा अधिकार देणाऱ्या संविधाना बद्दलच संविधान बदलाची अपेक्षा व्यक्त केली जात असल्याने पुन्हा देश पारतंत्र्यात घेऊन जायचा आहे का? जे हक्क अधिकार धर्म देऊ शकला नाही तेच हक्क अधिकार संविधान मिळवून देण्यासाठी लोकशाही देशात हेच ते संविधान कार्यरत आहे.एवढं सर्व चांगलं संविधान काम करत असताना सुद्धा संविधानाच्या विरोधातील भूमिका का येऊ लागली आहे? संविधान तर द्वेष करत नाही.मग संविधाना बाबतच द्वेषाची भावना का? संविधानाच्या विरोधात जाण्या जोगे संविधानाने नेमकं ह्याचं काय बिघडवलं हेच समजेना? संविधानाने कुणाचं काही बिघडवलं नाही तर देशातील नागरिकाला घडवलं आहे. संविधान लोकांना समजेल तेंव्हा समजेल पण संविधान भारतीय नागरिकाला मानवतावादी मूल्यांनी घडवत राहील. हा विश्वास आजही संविधाना बाबत वाटत आहे.

# ज्ञान हाच निर्व्यसनी जीवनाचा पाया

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**अज्ञान हे दुःख निर्मितीच केंद्र आहे . दुःख निर्माण झाल कि पावलं आपोआप व्यसनाच्या मार्गाने मार्गक्रमण करतात. पुरेसं ज्ञान असेल तर कोणत्याही प्रकारचा व्यसन आपला पाया आपल्या जीवनात आरंभ करू शकत नाही.प्रवासात चालकाची नजर हटली कि अपघात निश्चित असतो .तसच आपल्या जीवनातील जीवन मार्गावर मार्गक्रमण करताना ज्ञान मार्ग सोडला तर व्यसन लागण्यासाठी फार वेळ लागत नाही. म्हणून ज्ञान मार्ग जीवनाचा सुरक्षित मार्ग आहे. आपण ज्ञान मार्गावर असताना बहुतांश व्यसन हि आपल्या आजूबाजूला चुकुन सुद्धा फिरकत नाहीत.**

फिरकलीच तर आपली ते शिकार करू शकत नाहीत. आपली शिकार होऊ देयची नसेल तर आपला जीवन मार्ग हा ज्ञान सदृश असला पाहिजे. मुळात निर्व्यसनी जीवन राहण्यासाठी आपलं जीवन सदैव ज्ञान मार्गावरच असल पाहिजे. सुख दुःखांचा समुद्र म्हणजे जीवन, संकटाची मालिका आणि समस्यांची वादळं यामुळे जीवन वारंवार प्रभावित होत असतं आणि याच दरम्यान अनेक बाह्य घटक मग आपला प्रभाव निर्माण करून आपल्यावर नियंत्रण स्थापित करत असतात. मग या मधुनच आपण नशेच्या दिशेने प्रवास सुरू करतो. या सगळ्या मधून आपली सुटका फक्त आत्मज्ञानानेच होऊ शकते. आपल्या आजुबाजूला असणार वातावरण आपल्यवर काही परिणाम घडवून आणत असत. मुळात आपला परिसर, संगत, सहवास, आपला संपर्क, यावर बरंच काही अवलंबून असतं. या सगळ्या मध्ये महत्वाची बाब म्हणजे आत्मज्ञान आपल्या कडे किती या नुसार हा प्रभाव आपल्यावर परिणाम करतो. आयुष्यातील, वाटेवर, बिकट आति बिकट, टशा प्रंसगातून सही सलामत मार्गक्रमण करण्यासाठी उपयोगी पडणार आत्म ज्ञान हे अमृत आहे. ज्यांच्या जवळ आत्मज्ञान हे अमृत आहे. त्यांचं या सृष्टीवरील कोणतही विष विकार काही बिघडवु शकत नाही . सृष्टी वर जसं सकारात्मक शक्ति कार्यरत असतात त्याच पद्धतीने नकारात्मक, विघातक शक्ती देखिल कार्यरत असतात. पण या विघातक शक्तीपासून आपली सुटका करून घेण्यासाठी आपल्याकडे आत्मज्ञान असणं खूप गरजेचं आहे. म्हणून आपल्याकडं आत्मज्ञान असेल तर आपण कोणत्याही नशेच्या प्रभावात जाणार नाहीत. त्या मार्गावर धावणार नाहीत किंवा त्या दिशेने जाणार नाहीत. तशी वाटचाल देखिल कधीच करणार नाहीत. एवढी ताकद क्षमता आत्मज्ञानात आहे. म्हणून आत्मज्ञान हाच नशा मुक्तिचा पाया आहे . नशा हि नशाच मग ती कोणतीही असो, सत्ता, पद, पैसा, संपत्ती, प्रसिद्धी, किंवा याव्यतिरिक्त कोणतीही असेल .जीवनाची दिशा व दशा बदलणारी अवस्था म्हणजे नशा असते. सृष्टी वर असा कोणीही व्यक्ती नाही कि जो त्याची अंतरमनातून नशेच्या गर्तेत जाण्याची इच्छा असते. पण वेळ, काळ, परस्थिती, याचा प्रभाव आणि वेळच्या अनुषंगाने झालेले अघात त्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी खुणावत असतात आणि नेमकं याच वेळी आपल्याकडं आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटना घडामोडी विषयी परफेक्ट आध्यत्मिक ज्ञान नसेल तर मग मात्र आपण नशेच्या मार्गावर धावणार या



मध्ये अजिबात शंका नाही. कारण आपल्याकडं असणाऱ्या समर्पक ज्ञानमुळे आपल्याला त्या दिशेने जाण्याची आवश्यकता भासणार नाही. नशा कोणत्याही प्रकारची असो ती जीवनाच्या विनशाची दिशा निश्चित करत असते आणि या भयानक संकटातुन आपला बचाव व्हावा हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असती. पण महत्वाचा विषय हा आहे त्यावरील उपाय काय तर नशा मुक्ति साठी आत्मज्ञान हा एकमेव उपाय आहे आणि ज्याने आत्मज्ञान आत्मसात केले त्याला कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारची नशा करण्याची आवश्यकता भासणार नाही. म्हणून आपण आत्मज्ञानाने समृद्ध असल पाहिजे. म्हणजे जीवनातील कोणतीही नशा तिचा प्रभाव आपल्यावर दाखवू शकणार नाही. नशा म्हणजे फक्त अंमली पदार्थ इथं पर्यंत मर्यादित अर्था नही तर एकंदरीत मानवी जीवनात एकच बाब पुन्हा पुन्हा वारंवार आपलं लक्ष्य केंद्रित करण. नशा म्हणजे सर्व साधारण पणे व्यसन किंवा सवय प्रत्येकाला कोणत्या तरी प्रकारचं व्यसन असतंच व्यसन किंवा सवय मुळात अनेक वेगवेगळ्या प्रकारची आहे आणि या सगळ्या प्रकारातील व्यसनापासून आपली सुटका सहीसलामत करायची असेल तर आत्म ज्ञाना शिवाय तरूनोपाय नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# महानगरपालिकेच्या शाळा बंद करण्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहराच्या वेगवेगळ्या भागातील महानगरपालीच्या १४ शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी असल्याने या शाळांचे इतर मोठया शाळांमध्ये समायोजन केले असल्याची माहिती मनपाचे आयुक्त तथा प्रशासक यांनी तसेच मनपाच्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त नंदा गायकवाड यांनी दिली आहे. महानगरपालिकेच्या उर्दू व मराठी माध्यमाच्या शहरात ७६ शाळा आहेत. शहरातील गरीब मुलांच्या शिक्षणासाठी या शाळा महत्वाच्या ठरल्या आहेत. मात्र, महापालिकेत सत्ताधाऱ्यांनी व प्रशासनाने शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे सोडून १-१ शाळा बंद करण्याचा सपाटा लावला आहे. महापालिकेने कमी विद्यार्थी संख्येचे कारण पुढे करुन आता त्या शाळा बंद करुन त्या शाळांचे अन्य FC. या आधीही मनपाने ६ शाळा बंद करीत खाजगी संस्थेला दिल्या आहेत. मनपाच्या या अजून १४ शाळा बंद झाल्यास शहरातील गरीब असंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहतील. महापालिकेने या शाळा बंद न करता शाळांचा दर्जा सुधारावा, आपोआपच विद्यार्थी मोठया संख्येने शाळेत येतील व शाळांची पटसंख्या वाढेल. मनपाच्या ०५ शाळेत सीबीएसईचे वर्ग सुरु काही शाळा सुरु करणार असल्याची माहिती तत्कालीन मनपाचे प्रशासकांनी दिले होती. परंतु, त्या निर्णयाला फाटा देत मनपाच्या वतीने शाळा बंद करण्याचा घाट सुरु असल्याचे यावरुन सिध्द होते.

टप्पाटप्प्याने शहरातील मनपाच्या सर्व शाळा सिबीएसई पॅटर्न (इंग्रजी माध्यमाच्या) करुन शिक्षण घेण्यासाठी गरीब विद्यार्थ्यांना या शाळेचा लाभ द्यावा व मनपाच्या १४ शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्यावा, हो दिलेल्या सर्व मनपाच्या शाळा या महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्या सिबीएसई पॅटर्न कराव्यात, या मागण्याचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचेतो जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे जिल्हा उपाध्यक्ष योगेश उबाळे, आकाश साबळे, करण ठोंबरे, कैलास जाधव, संदिप अहिरे यांच्या सह्या आहेत.

# होमगार्ड यांच्या रास्त मागण्या मान्य करा : आ. किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विविध मागण्यांना घेऊन होमगार्ड महासंघाच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानात आंदोलन सुरु करण्यात आले आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई मंत्रालय येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत होमगार्ड यांच्या रास्त मागण्या मान्य करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील होमगार्ड हे पोलीस दलासोबत खांद्याला खांदा लावून नागरिकांच्या सुरक्षतेसाठी तत्पर असतात. परंतु सद्यास्थितीत त्यांच्यासमोर अनेक आव्हाने असून राज्यातील होमगार्ड यांच्या प्रमुख २० मागण्यांसाठी त्यांनी मुंबई येथील आजाद मैदानात आंदोलन सुरु केले आहे. महाराष्ट्र होमगार्ड ॲक्ट 1947 मध्ये सुधारणा अथवा बदल करण्यात यावा, भारत सरकारच्या आदेशानुसार होमगार्ड यांना 365 दिवस नियमित रोजगार उपलब्ध करुन देण्यात यावा, महाराष्ट्र होमगार्ड ॲक्ट 1947 मधील दर 3 वर्षांनी होणार्या पुनरनोंदणी पुनर्नियुक्ती प्रणाली पद्धत कायमस्वरूपी बंद करण्यात यावी, महाराष्ट्र होमगार्ड ॲक्ट 1947 मधे बॉम्बे पोलीस ॲक्ट प्रमाणे किंवा प्रादेशिक सेना टि.ए 118 इन्फैंट्री बटालियन या धर्तीवर सुधार करण्यात यावा, मानसेवी कर्मचारी पद आणि वेतनिय कर्मचारी पद असे भेदभावचे प्रकार नष्ट करून महाराष्ट्र होमगार्ड विभागात होमगार्ड सैनिकांना प्रतिनिधित्वाची समान संधी देण्यात यावी. तसेच पोलीस विभाग प्रमाणेच होमगार्ड विभागा करिता स्वतंत्र बजट ची व्यवस्था तसेच प्रतिवर्ष महामाई दरानुसार महागाई भत्ता देण्यात यावा, साप्ताहिक परेड भत्ता, उजळणी प्रशिक्षण भत्ता व तसेच आगामी काळात मध्ये येणारे सर्व प्रशिक्षण भत्ता व त्याचप्रमाणे शासनाचे पैरामिलिट्री फोर्स ला लावून दिलेले 6 महिन्याचे अतिदक्ष प्रशिक्षण शिबीर कर्तव्य भत्ता चे दर मानधनाचा सम प्रमाणानुसार देयक असावेत, इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र राज्य मध्ये देखील 3 वर्षे सेवा देवू



केलेले होमगार्ड सैनिकांना पोलीस विभाग, वन विभाग किंवा इत्यादी शासकीय प्रशासकीय विभागात 50% आरक्षण सह भरती निवड प्रक्रियेत वयात आणि उंचीत विशेष सवलत देत सरळ भरतीने नेमणूक देण्यात यावी यासह इतर मागण्यांना घेऊन होमगार्ड महासंघाच्या वतीने मुंबई येथील आजाद मैदानात आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई मंत्रालय येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत होमगार्ड महासंघाच्या मागण्यांकडे त्यांचे लक्ष वेधले असून या बाबत चर्चा केली आहे. सदर विषय हा राज्यातील ४५ हजार १७१ होमगार्ड यांचा असून ही संख्या मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. या होमगार्ड यांनी होमगार्ड महासंघाच्या नेतृत्वात आझाद मैदानात सुरु केलेल्या आंदोलनाची आपण दखल घेत त्यांच्या रास्त असलेल्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणीही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना केली आहे.

# आपेगाव येथे ग्रामसभेत अनेक ठराव पारित

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** चालू वित्तीय वर्षाची सार्वजनिक ठिकाणी पहिली ग्रामसभा बुधवार रोजी पैठण तालुक्यातील आपेगाव ग्रामपंचायने मारोती मंदिर समोरील सभागृहात घेण्यात आली. सभेदरम्यान गाव विकासासंदर्भातचे अनेक ठराव चर्चेअंती पारित करण्यात आले. सरपंच पांडुरंग औटे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या ग्रामसभेत रोजगार हमी योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षासाठी आराखडा तयार करणे, विविध विकास योजनेंतर्गत कामाची निवड, रमाई आवास योजना,रोहयो अतंर्गत बजेट तयार करणे, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्लास्टिक बंदी, बालविवाह प्रतिबंध,रो हयो अंतर्गत शाळेला कंपाउंड,अटल बांधकाम घरकुल, अनु,जाती, जमाती,घटक वस्तीचा विकास, जनावरांच्या लम्पी आजार, सन २०२३, २४ ते २०२८ पर्यंत गाव विकासाचा बृहत विकास आराखडा तयार करणे या बाबतीत ठराव पारित करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी वंसत ईगळे यांनी वरील संदर्भात माहिती वाचन करून ग्रामपंचायतचा कर भरून सहकार्य करण्याचे अवाहन केले.आपेगावात प्रथमच ग्रामसभेचे व्हिडीओ चित्रण करण्यात आले आहे. ग्रामसभेला उपसरपंच सोमनाथ औटे, ग्रा.पं. सदस्य वसिम पटेल, वैजिनाथ औटे, रामभाऊ औटे, गणेश कोल्हे, सुधाकर कोल्हे, गफ्फार पटेल, सोमनाथ कोल्हे, सोपान औटे, गणेश औटे, तलाठी, पशुधन विकासअधिकारी ढगेसह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.


सस्नेह निमंत्रण

आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होतो की,
आई तुळजाभवानी कृपेने मंठा शहरात आपल्या सेवेत...
डॉ.सौ. विद्या निर्वळ (होंडे)
B.A.M.S.M.D.(AUR.) DYT यांचे
श्री विश्वकल्पना आयुर्वेदिक व पंचकर्म चिकित्सालय
मंठा, जि. जालना
भव्य शुभारंभ सोहळा
दि. १ सप्टेंबर २०२३, शुक्रवार रोजी, सकाळी ठीक १०: ३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.
यानिमित्त आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

|| उद्घाटक ||
श्री ह.भ.प. गुरुवर्य सेवाधारी पौळ बाबा

|| प्रमुख अतिथी ||
मा.आ.श्री बबनराव लोणीकर, (माजी मंत्री- पाणीपुरवठा व स्वच्छता- म.राज्य )
मा.आ. श्री राजेशभैय्या राठोड ( विधानपरिषद सदस्य )
मा.आ. श्री सुरेशकुमार जेथलिया ( माजी आमदार,परतूर- मंठा )
मा.श्री ए.जे.बोराडे पाटील (सभापती तथा जिल्हाप्रमुख उ.बा.ठा.शिवसेना )
मा.गोपाळभाऊ बोराडे (उपसभापती कृ.उ.बा.स,मंठा )
मा. सौ .मीराताई बालासाहेब बोराडे (नगराध्यक्षा, मंठा )
व सर्व सन्माननीय नगरसेवक मंठा, जि. जालना

|| विनित ||
उद्धवराव निवृत्ती निर्वळ, डॉ. ईश्वर उद्धवराव निर्वळ, डॉ. सौ. विद्या ई. निर्वळ-होंडे.


# वंचितचे तहसीलदारांमार्फत गृहमंत्र्यांना निवेदन


आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वंचित बहुजन आघाडी खुलताबाद तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद यांचे नेतृत्वात तहसीलदार मार्फत गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना निवेदन देण्यात आले. सविस्तर माहिती अशी की, हरेगाव, ता. श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर येथील शुभम विजय माघाडे यांना जातीयवादी करणारे नामे युवराज गलांडे पाटील व त्यांच्या साथीदारांनी या बौद्ध तरुणास घरात जेवण करीत असताना घरातून उचलून नेले व त्याला कबूतर चोरले म्हणून झाडाला उलटे टांगून अंगावर लघवी केली. थुंकी चाटायला लावली. या घृणास्पद तिरस्करणीय जातीय द्वेशातून नग्न धिंड करून मारहाण व भेदभाव शिवीगाळ व अपमान करून अशा पद्धतीने मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटनेचा वंचित बहुजन आघाडी खुलताबाद च्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आले. व संबंधित घटनेच्या आरोपीवर अट्रोसिटी ॲक्ट कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी वंचित बहुजन आघाडीने मागणी केलेली आहे. नसता वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपात धरणे आंदोलने इत्यादी करण्यास भाग पडेल याची प्रशासनाने नोंद घ्यावी असे निवेदनात नमूद केले आहे यावेळी, तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद, जिल्हा संघटक बाबा पटेल, ता.महासचिव राजाराम घुसाळे, ता. संघटक सुरेश गवळे, ता. पदाधिकारी वाल्मीक गवळे, शहराध्यक्ष सोमीनाथ काळे, वेरूळ सर्कल प्रमुख नईम चाऊस, बाजार सावंगी सर्कल प्रमुख अरुण गायकवाड, कारभारी लक्ष्मण बनकर, कलीम पठाण व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.














## माणुसकीचा डोळा

आधुनिक केसरी

**माणसाची कथनी आणि करणी आता एक उरलेली नाही. मुखवटे परिधान करून समाजात वावरणारी माणसंच अधिक झालेली आहेत. माणसाची बदलली नियत बघून एक शायर म्हणतो आईना कोई ऐसा बना दे ए खुदा,जो इंसान का चेहरा नही; किरदार दिखा दे यावरून २७ ऑगस्ट रोजी बुलडाणा येथे पार पडलेल्या बुलडाणा नागरी मंडळाच्या कार्यक्रमातील एक किस्सा आठवला. सूत्रसंचालन माझ्याकडे होते.माझ्या दोन डोळ्यापैकी एक डोळा हा कृत्रिम आहे.मात्र या दोन्ही डोळ्यापैकी कोणता डोळा कृत्रिम आहे आणि कोणता डोळा खरा आहे ते सांगा असा प्रश्न एका वक्त्याने उपस्थितांना केला.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

कार्यक्रम शाळेत विद्यार्थ्यांसमोर असल्याने त्याने मुलांसह हा प्रश्न शिक्षकांना देखील विचारला. शिक्षकांना देखील प्रश्न पडला की खरंच ,या माणसाचा कोणता डोळा खरा आणि कोणता खोटा..? त्यांना देखील सांगता येईना. तितक्यात एक मुलगा उभा राहीला आणि त्या वक्त्याला म्हणाला,"सर,तुमचा डावा डोळा कृत्रिम आहे". त्या वक्त्याला आश्चर्य वाटले. लाखो रुपये खर्च करून अमेरिकेतून आपण हा डोळा बसवून आणला. आपला कोणता डोळा खरा आणि कोणता डोळा कृत्रिम हे कुणालाच ओळखता आले नाही,अन ह्या चिमुकल्या मुलाने ओळखले तरी कसे..?

त्याने त्या मुलालाच विचारले की, "तू अचूक कसे काय ओळखले."

त्यावर तो मुलगा म्हणाला,"सर..मला तुमच्या त्या डाव्या डोळ्यात प्रेम दिसलं."

गोष्ट छोटीशी मात्र माणसाच्या डोळ्यात हल्ली माणुसकी-प्रेम दिसायला लागले नाही,डोळ्यातला-मनातला प्रेम भाव आटत चालला असल्याची ही गोष्ट गणेश शिंदे नावाच्या पुणे येथील वक्त्याने बुलढाणा नागरी मंडळाच्या कार्यक्रमात सांगितली आणि मी अंतर्मुख झालो.

नागपूर येथे बुलडाणा जिल्ह्यातील नागरिकांनी एकत्रित येत बुलढाणा नागरिक मंडळ स्थापन केलेले आहे.या मंडळाचे कार्य वाखाणण्याजोगे आहे.ह्या मंडळाच्या स्थापनेपासून तर आजपर्यंतचा प्रवास यावर एक स्वतंत्र "गोडवा" लिहता येईल एव्हडे कार्य या मंडळाचे आहे.मात्र माझा आजचा गोडवा हा बुलडाणा नागरी मंडळाच्या कालपरवा ला बुलडाणा येथे पार पडलेल्या कार्यक्रमात ह्या मंडळाने गणेश शिंदे यांचे व्याख्यान ठेवले होते. त्या व्याख्यानात "माणसाने माणसाशी माणसासम वागणे" या विषयावर गणेश शिंदे बोलत होते त्यावर आहे.

खरं म्हणजे वक्ते गणेश शिंदे यांनी सांगितलेला दृष्टांत प्रत्येकाला विचार करायला लावणारा आहे.

नाती दुरावतांना दिसत आहेत.

पूर्वी नात्यात जो ओलावा दिसायचा तो अलीकडे दिसेनासा झाला आहे.मोठी माय,मोठे बाबा ,मधवी माय ,मधवे बाबा या पद्धतीने परिवारातील लोकांना बोलल्या जायचे.गावातील कर्ता पुरुष अथवा गावपुढारी समोरून चालला की रस्त्याच्या बाजूला होत आदर व्यक्त करत त्यांना रस्ता देणारी माणसं आता उरली नाहीत.

कुणाची 'वाट' कशी लावायची, त्या क्षणाची वाट पाहणारी माणसंच आजूबाजूला दिसत आहेत.

ज्या दिवशी समाजसेवा करण्याची गरज पडणार नाही, असा दिवस जर उगवला तर या देशात खऱ्या अर्थाने सगळे ऑल इज वेल सुरू असल्याचे समजता येईल. वृद्धाश्रम उभी करणं ही चांगली बाब नसल्याचे अनेकजण बोलून दाखवतात.मात्र वृद्धाश्रम काढण्याची समाजसेवकांना गरज का वाटते याकडे कुणी गांभीर्याने बघत नाहीत.

माणुसकी चे दर्शन दुर्मिळ होत चालले आहे.

पूर्वी एखादा अपघात झाला की त्याची जबाबदारी उचलत मंत्री-मुख्यमंत्री आपल्या पदाचा राजीनामा द्यायचे आणि आता एकीकडे अपघातात जळून कोळसा झालेल्या २५ जणांवर अंत्यसंस्कार सुरू असतांना दुसरीकडे शपथविधी सोहळा सुरु असतो. यथा राजा तथा प्रजा असेच चित्र बघायला मिळत असल्याने प्रजेच्या भावना देखील बोथट झालेल्या आहेत. नाती फक्त सांगण्यापूरती उरली आहेत.

आपलं कुणाशी काम असेल तर संवाद कायम ठेवायचा आणि काम उरकलं की महिनों महिने भेटायचं नाही की ख्याली खुशाली देखील विचारायची नाही...

पूर्वी नातलगांकडे ,मामा,मावशी ,आत्या कडे ८,८ दिवस रहायची मजा काही औरच होती...

पण आता मामाच्या गावाला जाणारी झुक झुक आगिनगाडी कवितेपुरतीच राहली आहे.

माणसानं आपलं नातं पैशासोबत जोडल आहे.स्वार्थ आणि पैसा याव्यतिरिक्त तो इतरत्र बघायला तयार नाही. भावांभावांत प्रेमभाव बघायला मिळत नाही.

या बाबत बुलडाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांनी सांगितलेला एक किस्सा आवर्जून सांगता येईल.

ते म्हणाले की एका गावात मंदिरात लिहिलेलं एक वाक्य मला फार आवडलं..

ते वाक्य असं होतं की ज्याचे आपल्या भावासोबत पटत नाही,त्याने मंदिरात दर्शनासाठी येऊ नये.

शेवटी याला अनुसरून एक शेर आठवतो...

बहुत से कागज मिल जाते है एक खासियत बेचकर,लोग पैसे कमाते है आजकल रिश्ते और इंसानियत बेच कर

## 'मुक्त राजकारण'करताना अर्थव्यवस्थेचाही विचार व्हावा!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**निवडणूक लोकसभेची असो की राज्य विधासभेची राजकीय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी मोफत घोषणा करतात. सध्या पाच राज्यातील मिझोरम, छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान, तेलंगाणा विधानसभांच्या व लोकसभेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे. भारतात राजकिय पक्षांकडून मुक्त राजकारण अर्थात घोषणांचा व फुकटच्या घोषणा करण्याचा सपाटा सुरू झाला आहे. निवडणुकीचा हंगाम जवळ आला असताना, राजकीय पक्ष त्यांच्या आश्वासनांसह मतदारांना आकर्षित करण्याची योजना आखत आहेत, ज्यात मोफत देणग्यांचा समावेश आहे. गेल्या काही वर्षांत फुकटचे राजकारण हा निवडणुकीच्या लढाईचा अविभाज्य भाग बनला आहे. निवडणूक प्रचारादरम्यान आश्वासने देताना केवळ राजकीय पैलू लक्षात घेणे शहाणपणाचे नाही, तर अर्थसंकल्पीय वाटप आणि संसाधने मर्यादित असल्याने आर्थिक भाग लक्षात ठेवणे आवश्यक आहे. फुकटबद्दल बोलताना राजकारणासोबत अर्थव्यवस्थेचाही विचार करायला हवा.**

राजकीय पक्ष लोकांची मते सुरक्षित करण्यासाठी मोफत वीज/पाणी पुरवठा, बेरोजगार, रोजंदारी कामगार आणि महिलांना भत्ते, तसेच लॅपटॉप, स्मार्टफोन इत्यादी गॅझेट देण्याचे आश्वासन देतात. या प्रथेच्या बाजूने आणि विरुद्ध अनेक युक्तिवाद आहेत. अशा पद्धतीच्या समर्थकांचा असा युक्तिवाद आहे की मतदारांना हे माहित असणे महत्वाचे आहे की पक्ष सत्तेवर आल्यास काय करेल आणि या पर्यायांचे वजन करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. मोफत देण्यास विरोध करणाऱ्यांचे म्हणणे आहे की यामुळे राज्यावर तसेच केंद्रीय तिजोरीवर (लोकसभेच्या निवडणुका झाल्यास) मोठा आर्थिक भार पडतो. भारतासारख्या देशात जेथे राज्यांमध्ये विकासाची एक विशिष्ट पातळी आहे (किंवा नाही), जेव्हा निवडणुका येतात तेव्हा लोकांच्या राजकारण्यांकडून/राजकीय पक्षांकडून अपेक्षा असतात ज्या मोफत देण्याच्या आश्वासनांनी पूर्ण केल्या जातात.याशिवाय जवळच्या इतर राज्यांतील लोकांना जेव्हा मोफत सुविधा मिळतात, तेव्हा निवडणूक असलेल्या राज्यांतील लोकांच्या अपेक्षाही वाढतात. विशेष म्हणजे कमी विकसित आणि जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांमध्ये अशा सुविधा गरजेनुसार किंवा मागणीवर आधारित असतात आणि राज्याच्या उन्नतीसाठी असे अनुदान देणे आवश्यक ठरते. या विरोधात असा युक्तिवाद केला जातो की मोफत देणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची स्पर्धात्मक बोली बनली आहे, तथापि एक मोठी अडचण अशी आहे की कोणत्याही घोषित मोफत गोष्टींचा अर्थसंकल्पीय प्रस्तावात समावेश केला जात नाही. अशा प्रस्तावांच्या निधीचा सहसा पक्षांच्या मेमोरँडम किंवा घोषणापत्रांमध्ये समावेश केला जात नाही. मोफत घोषणा व आश्वासना मुळे सरकारी तिजोरीवर ताण येतो आणि भारतातील बहुतेक राज्यांची आर्थिक स्थिती चांगली नाही आणि महसुलाच्या बाबतीत फारच मर्यादित संसाधने आहेत. शिवाय घाईघाईत मोफत घोषणा केल्याने अपेक्षित लाभ मिळत नाही आणि केवळ बेजबाबदार खर्चास कारणीभूत ठरते. गरिबांना मदत करायची असेल, तर वीज, पाणी बिल माफ अशा कल्याणकारी योजना न्याय्य ठरू शकतात. तथापि, पक्षांकडून निवडणूक-प्रेरित अव्यवहार्य घोषणा राज्यांच्या अर्थसंकल्पाच्या बाहेर केल्या जातात.जर राजकीय पक्षांनी प्रभावी आर्थिक धोरणे बनवली, ज्यामध्ये भ्रष्टाचार किंवा गळती होण्याची शक्यता नाही आणि लाभार्थ्यांपर्यंत त्यांचा प्रवेश योग्यरित्या सुनिश्चित केला गेला तर अशा विनामूल्य घोषणांची गरज भासणार नाही. पक्षांनी जी आर्थिक धोरणे किंवा विकास मॉडेल्स स्वीकारण्याची योजना आखली आहे ती लोकांसमोर स्पष्टपणे सांगितली पाहिजेत आणि प्रभावीपणे अंमलात आणली पाहिजेत. याशिवाय, पक्षांना अशा धोरणांचे आर्थिक परिणाम आणि खर्च याबद्दल योग्य माहिती असणे आवश्यक आहे. केंद्रात आणि राज्यातील सत्ताधारी पक्ष हा अशा उपाययोजनांचा अवलंब करणारा आणि आदर्श ठेवणारा पहिला पक्ष असावा. विवेकी मागणी-आधारित भारत हा एक मोठा देश आहे आणि अजूनही दारिद्र्यरेषेखालील लोकांचा एक मोठा समूह आहे. देशाच्या विकास आराखड्यात सर्व लोकांना सहभागी करून घेणेही आवश्यक आहे. राज्यांच्या अर्थसंकल्पात सहजतेने सामावून घेता येऊ शकणाऱ्या मोफत किंवा सबसिडी न्यायपूर्वक आणि विवेकपूर्णपणे दिल्यास जास्त नुकसान होत नाही आणि त्याचा लाभ घेता येतो. लहान मुलांना मोफत शिक्षण देणे किंवा शाळांमध्ये मोफत जेवण देणे यासारख्या मूलभूत गरजांवर अनुदान देणे हा सकारात्मक दृष्टिकोन आहे. सत्तेत असताना राजकिय पक्षांनी वेळेचा सदुपयोग योग्य पद्धतीने केला पाहिजे. म्हणजे पाच वर्षांच्या कालावधीसाठी राजकीय पक्षाचे सरकार सत्तेवर असताना, मोफत देण्याचे आश्वासन देण्याऐवजी, या महत्त्वपूर्ण काळात योग्य तरतूद केली पाहिजे. समाजाचा विकास आणि सुशासन सुनिश्चित करणे ही सरकार आणि इतर सर्व राजकीय पक्षांची जबाबदारी आहे, त्यामुळे लोकांना अशा मोफत सुविधा देण्यावर मर्यादा असणे आवश्यक आहे. आर्थिक दृष्टीने फुकट्या घोषणांचे परिणाम समजून घेणे आणि त्याचा करदात्यांच्या पैशाशी संबंध जोडणे आवश्यक आहे. सबसिडी आणि फुकट्या घोषांमध्ये मध्ये फरक करणे देखील आवश्यक आहे कारण सबसिडी वाजवी आहेत आणि विशेषतः लक्ष्यित फायदे आहेत जे मागण्यांमुळे उद्भवतात तर फुकट्या घोषणा खूप भिन्न आहेत. प्रत्येक पक्षाला लक्ष्यित गरजू लोकांना लाभ मिळवून देण्यासाठी सबसिडी इकोसिस्टम तयार करण्याचा अधिकार असला तरी, त्याचा राज्य किंवा केंद्र सरकारच्या आर्थिक आरोग्यावर दीर्घकालीन भार नसावा. आपली मते फुकट विकून आपण कोणती चूक करतो हे लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी या गोष्टींना विरोध केला नाही तर त्यांच्याकडून चांगले नेते होण्याची अपेक्षा करता येणार नाही. फुकटात खर्च होणारा पैसा कल्पकतेने रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी, धरणे, तलाव यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी वापरला तर नक्कीच सामाजिक उन्नती होईल आणि राज्याची प्रगती होईल. लोकच योग्य निवड करून राजकीय पक्षांना अशा फुकटपासून अधिक प्रभावीपणे परावृत्त करू शकतात.

## विश्वचषकाची रंगीत तालीम



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**कालपासून ( ३० ऑगस्ट ) श्रीलंकेत ५० षटकांचा म्हणजे एकदिवसीय क्रिकेटचा रणसंग्राम सुरू झाला आहे. आशिया खंडातील क्रिकेटचा राजा कोण हे ठरवण्यासाठी भारतासह आशिया खंडातील सहा देश एकमेकांना भिडणार आहेत. या स्पर्धेत जो संघ विजयी होईल तो आशिया चषकावर स्वतःचे नाव कोरणार आहे. आशिया खंडातील भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पात्रता फेरीत विजय मिळवून मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरलेला नेपाळ या सहा संघात ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना काल पाकिस्तान आणि नेपाळ यांच्यात झाला असून २ सप्टेंबर रोजी या स्पर्धेतील सर्वात हाय व्होल्टेज सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तानमध्ये रंगणार आहे. वास्तविक आशिया चषकाची पात्रता फेरी याआधीच सुरू झाली असून या पात्रता फेरीत नेपाळ हा संघ पहिल्यांदाच पात्र ठरला आहे असून तो भारत, पाकिस्तान यांच्या गटात समाविष्ट झाला आहे.**

दुसऱ्या गटात श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे देश आहेत. प्रत्येक गटातून दोन संघ असे एकूण चार संघ सुपर फोरसाठी पात्र ठरतील त्यांच्यात पुन्हा लढत होऊन दोन संघ अंतिम फेरीत पोहचतील. या स्पर्धेत सहा संघ खेळत असले तरी भारत आणि पाकिस्तान या दोन संघांना विजेतेपदासाठी पसंती दिली जात आहे.

भारत आणि पाकिस्तान हे या स्पर्धेत प्रबळ दावेदार मानले जात असले तरी तरी श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे संघही चांगली तयारी करुन मैदानात उतरले आहेत त्यामुळे ही स्पर्धा रंगतदार ठरेल यात शंका नाही. भारतासाठी ही स्पर्धा विशेष महत्वाची आहे कारण २०१६ आणि २०१८ साली भारताने विजेतेपद मिळवले आहे. मागील वर्षी म्हणजे २०२२ साली ही स्पर्धा जिंकून भारत आशिया चषक जिंकण्याची हॅट्ट्रिक साजरी करेल का याकडे क्रिकेट प्रेमींचे लक्ष लागले होते मात्र दुर्दैवाने भारत त्या स्पर्धेत अपयशी ठरला आणि श्रीलंका मागील वेळेचा विजेता ठरला मागील वेळी झालेली चूक दुरुस्त करून भारत यावेळी विजेता ठरेल अशी आशा भारताच्या १४० कोटी जनतेला आहे. यावेळी भारतीय संघ या स्पर्धेत हॉट फेव्हरेट समजला जातोय कारण भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात संतुलित संघ आहे. भारताचे सर्व खेळाडू अनुभवी असून फॉर्मात आहेत. भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि ईशान किशन यांची सलामीची जोडी प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर तुटून पडली की मधल्या फेरीचे काम हलके होऊ शकते. तिसऱ्या क्रमांकावर शुभमन गिल हा फॉर्ममध्ये असलेला युवा फलंदाज आपल्या बॅटचा जलवा दाखवेल. माजी कर्णधार विराट कोहली हा चौथ्या क्रमांकावर येऊ शकतो. दोन ते तीन वर्ष बॅडपॅच मध्ये असलेला विराट आता बॅडपॅच मधून बाहेर पडला असून त्याची बॅट आता पुन्हा पूर्वीसारखी तळपू लागली आहे. विराट कोहली फॉर्मात आल्याने भारताला या स्पर्धेत विजेतेपद मिळवण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. पाचव्या क्रमांकावर सुर्यकुमार यादव येईल तो सध्या चांगलाच फॉर्मात असून एकहाती सामना जिंकून देऊ शकतो. त्याच्यानंतर अष्टपैलू खेळाडू आणि या भारताचा सर्वात स्फोटक फलंदाज हार्दिक पांड्या येईल ज्या दिवशी हार्दिक पांड्याची बॅट चालते त्यादिवशी भारत विजयी होतो. त्यानंतर के एल राहुल किंवा श्रेयश अय्यर फिनिशरची भूमिका निभावतील. रवींद्र जडेजा हा देखील अष्टपैलू खेळाडूची भूमिका बजावत असल्याने संघाचे संतुलन वाढले आहे. वेगवान गोलंदाजीची धुरा अनुभवी जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज सांभाळतील तर फिरकी गोलंदाजीची धुरा अक्षर पटेल, कुलदीप यादव यांच्यावर आहे. हे सर्व खेळाडू एकदिवसीय क्रिकेटमधील मधील जाणकार खेळाडू आहेत विशेष म्हणजे या खेळाडूंना श्रीलंकेमध्ये खेळण्याचा चांगला अनुभव आहे. तेथील खेळपट्टी आणि हवामानाशी भारतीय खेळाडू परिचित आहेत. त्यामुळे भारतच या स्पर्धेचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. भारताला या स्पर्धेत जर कोणी आव्हान देऊ शकेल तर तो पाकिस्तान. भारत आणि पाकिस्तान यांच्यात २ सप्टेंबर रोजी पहिली लढत होत असून त्या सामन्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. नेहमीप्रमाणे हा सामना रंगतदार होणार यात शंका नाही.

अलीकडच्या काळात भारताप्रमाणेच पाकिस्तानची कामगिरीही चांगली झाली आहे. त्यांचा कर्णधार बाबर आझम हा तुफान फॉर्ममध्ये असून रिझवान नावाचा त्यांचा विकेट किपर बॅट्समन देखील फॉर्ममध्ये आहे. विशेष म्हणजे या दोंघांनी याआधी भारताविरुद्ध चांगली कामगिरी केली आहे. या दोघांनीच मागील वर्षीच्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अभेद्य भागीदारी करून भारताला पराभूत केले होते. त्यामुळे या दोंघांना लवकरात लवकर बाद करणे हे भारतीय गोलंदाजाचे लक्ष असेल.

# मग कोणीही आत्महत्या करणार नाहीत ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी


**पाऊस.......पाऊस कधी येतो, कधी नाही. कधी जास्त येतो. कधी काहीच येत नाही. म्हणतात की पाऊस हा झाडांवर अवलंबून असतो. खरंच पाऊस हा झाडांवर अवलंबून तरी असतो का? तर याचं उत्तर होय असंही देता येईल. नाही असंही देता येणार नाही. होय असं द्यायचं झाल्यास सुर्याच्या उष्णतेपासून जी पाण्याची वाफ होते. ती पाण्याची वाफ वर आकाशात जाते. ती एवढी वर जाते की ती वर जावून थंड होते. ती थंड झालेली वाफ........त्या वाफेतून बाष्पाचे पुंजके तयार होतात. ते बाष्पयुक्त पुंजके वाहायला लागतात व जिथं डोंगरं असतात व जिथं झाडं असतात. तिथं ते अडतात व त्या ठिकाणी पाऊस पडतो. हे बाष्पयुक्त पुंजके तिथंच थंड होतात असं नाही.**

तर ते त्या डोंगराच्या पुढेही वाहात असतात. ते पुढंही पावसाच्या रुपानं पडतात. म्हणूनच जिथं डोंगरं वा पर्वत असतात. त्या परिसरात पाऊस अतिप्रचंड पडतो. महत्वपुर्ण गोष्ट ही की पाऊस पडण्यात डोंगराचा संबंध येतो. झाडांचा नाही. मग झाडांचा पावसाशी संबंध का जोडण्यात येतो? त्याचा तर पावसाशी संबंध नाही. बरोबर आहे. झाडाचा पावसाशी दुरदुरचा संबंध दिसत नाही. मग असे असतांना जिथं डोंगर वा पर्वत नसतं, तिथं पाऊस कसा काय पडत असेल? असा प्रश्न प्रत्येकाला पडल्याशिवाय राहात नाही. याबाबत माझं तुटकंफुटकं मत व्यक्त करतो. कदाचीत ते बरोबरही असू शकते. आपण पाहिलं आहे की काही ठिकाणी पर्वत वा डोंगर नसतं, तरीही तिथं पाऊस पडतो. त्याचं कारण म्हणजे वातावरणातील हवेचा दाब. तो वाढला वा कमीजास्त झाला की विजा कडाडतात. गडगडाट ऐकायला येतात. ही वीज झाडांवरच जास्त पडते. त्याचं कारण काय असावं? त्याचं कारण असतं झाडांचं श्वास घेणं. झाडं श्वास घेतांना कार्बनडाय ऑक्साईड शोषून घेतात व ऑक्सीजन वातावरणात सोडतात. परंतु कधीकधी हीच झाडं हवेतील ऑक्सीजन शोषून घेतात व कार्बनडाय ऑक्साईड हवेत सोडतात. त्यातच ही झाडं जेव्हा ऑक्सीजन हवेत प्रवाहीत करतात. तेव्हा या ऑक्सीजनचा हवेतील अतिप्रमाणातील हेलिअमशी संपर्क येवून तो जळतो व फट् असा आवाज येवून वीज निर्माण होत असते. यातूनच पाण्याची निर्मीती होते. जर अति प्रमाणात झाडं असली तर अति प्रमाणात ऑक्सीजन प्रवाहीत होवू शकतो व याच अति प्रमाणातील ऑक्सीजनचा हेलीअमशी संयोग होवू शकतो व अति प्रमाणात पाण्याची निर्मीती होवू शकते. म्हणूनच अति प्रमाणात झाडं असायला हवीत. पाऊस झाडांपासून येतो. याचं सोपं उदाहरण देतो. वातावरणातील हेलीअम अर्थात हायड्रोजन. हा जेव्हा झाडापासून प्रवाहीत होणाऱ्या ऑक्सीजनशी संयोग पावतो. तेव्हा फट् असा आवाज येतो. हा गडगडाट होय व तो ऑक्सीजनसोबत संयोग पावतांना लख्खं प्रकाश निर्माण होतो. हीच वीज होय आणि तो संयोग पावल्यावर पाणी तयार होतं. हाच पाऊस होय. महत्वाचं सांगायचं झाल्यास झाडांना आपण आपले मित्र मानतो. का मानतो? कारण झाडं आपल्याला वरील प्रकारे पाऊस देतात. फळ, फुल देतात. सावलीही देतात. इमारती लाकूड देतात, अन्नधान्य देतात व इतर बरंच काही देतात. ज्याचा विचारही आपण करु शकत नाही. ते पाऊसही देतात. परंतु आपण त्यांना तोडतो. जंगलं नष्ट करतो. कारण आपल्याला राहायला जागा नसते. आपल्याला आपलं पोट भरायला शेत नसते. म्हणूनच आपण जंगलही तोडून साफ करतो. परंतु त्याचा परिणाम होतो आपल्या पावसावर होतो. पाऊस पडत नसल्यानं सुका दुष्काळ निर्माण होतो. पाऊस पडत नसल्यानं पीक होत नाही. सतत मोडी होतात. पाऊस पडत नसल्यानं अख्खं पीक करपतं. घरात खायला दाणाही नसतो. उपाशी पोटी राहावं लागतं. हं, जबाबदारी ज्याच्यावर असते, तो राहतोही एकवेळ उपाशी. परंतु त्यावर अवलंबून असणारे घटक म्हणजे त्याची मुलं बाळं जेव्हा



उपाशी असतात. तेव्हा विचार येतो. तो विचार एवढा भयंकर असतो की त्याची परियंतीच गावता येत नाही. कर्जावर कर्ज वाढतं. सावकार वा बँका त्रास देतात. मग कर्जाचा डोंगर एवढा वाढतो की अचानक विचार आल्यानं ती जबाबदारीची पावलं कोणताही वेळेवर निर्णय घेवू शकत नाहीत. ती पावलं अचानक त्या झाडाकडं वळतात. जे आपल्या शेतात डौलानं उभं असतं. ते काटेरी आपल्या काही कामाचं नाही, म्हणूनच आपण त्याला तोडलेले नसते. ज्याला बाभळीचं झाड म्हणतात. बाकी हिरवीगार सर्व झाडं आपणच तोडलेली असतात. ती चोपडी असतात म्हणून. यात जे वाचलं असतं. ज्याचं काही काम नसतं. जे पाऊस पाडत नाही. तेच झाड आपण निवडतो. अचानक जबाबदारीची आपली पावलं त्याच झाडाकडं वळतात. त्या झाडावर दोराचं एक टोक टाकतात आणि दुसरं टोक आपल्या गळ्यात. मग तो दोर आवरला जातो. त्यानंतर काय घडतं ते सर्वांनाच माहीत आहे. विशेष सांगायचं म्हणजे झाडं आपली मित्र आहेत असे आपण बरेचदा म्हणतो. परंतु आपण त्यांच्याकडे मित्रत्वाच्या भावनेनं पाहतो का? याचं उत्तर नाही असंच आहे. आपणच त्यांच्याशी विश्वासघात करतो हे सत्य आहे. आज चांद्रयान पाठवून चंद्रावर मानव जाणार व वस्ती करणार असा संकेत चांद्रयानानं दिलेला आहे. कारण आज पृथ्वीवर निर्वासीताचा प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण पृथ्वीवरचं पाणी संपत आलं आहे. म्हणूनच चंद्रावर पाणी शोधण्यासाठी आपण चांद्रयान पाठवलं आहे. भविष्यात आपली योजना आहे की पृथ्वीतलावरील पाणी पुर्णतः संपल्यास आपण चंद्रावर वस्ती करण्यासाठी जावू. परंतु ते पाणी संपण्यापुर्वी आपण त्यावर उपाययोजना केली तर.......तर कदाचीत पृथ्वीतलावरील पाणीच संपणार नाही व आपले चंद्रावर जाण्याचे स्वप्न ते स्वप्नच राहील. महत्वाचं म्हणजे ते स्वप्न, स्वप्नच राहायला हवं. पृथ्वीवरील पाणी संपूच नये. त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. जेवढी झाडं आपण तोडतो आपल्या निवासाचा प्रश्न सोडविण्यासाठी. त्याच्या द्वितीय प्रमाणात आपण झाडं लावली पाहिजेत. प्रत्येक गावात वा शहरात विपूल प्रमाणात झाडं दिसायला हवीत. ज्याच्यातून प्रवाहीत होणा-या ऑक्सीजनचा वातावरणातील हायड्रोजनशी संयोग होवून पावसाची निर्मीती होईल. हे जेव्हा आपण करु. तेव्हाच पाऊस पडेल. अन्नधान्य पिकेल. आपल्याला भरघोस प्रमाणात अन्नधान्य मिळेल व कोणीही उपासमार झेलणार नाही आणि मग अचानक जबाबदारीची वा इतर कोणतीच पावलं बाभळीच्या झाडाकडं वळणार नाही व कोणीच त्या झाडाला दोर बांधून आत्महत्याही करणार नाही हे तेवढंच खरं आहे यात शंका नाही.

# एक होती मणिबेन




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**कोण होती मणिबेन ? मी कशासाठी सांगतोय तिची गोष्ट ? मणिबेन आहे एका देशभक्त स्त्रीचं नाव. देशासाठी ती तुरुंगातही गेली, खूप खस्ता खाल्ल्या. नुकताच आपण स्वातंत्र्य दिन साजरा केला. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवही साजरा केला. अशा वेळी ज्यांनी ज्यांनी देशासाठी योगदान दिलं आहे, त्यांचं स्मरण करायचं असतं. ते आपण करतोच पण भारतमातेच्या गळ्यातील देशभक्तरूपी जी मौक्तिकमाला आहे, त्यातील काही अमूल्य रत्ने अशीही असतात की ज्यांच्या त्याग आणि बलिदानाकडे कोणाचं फारसं लक्ष जात नाही. अशा मौक्तिकमालेतीलच एक तेजस्वी मणी म्हणजे मणिबेन ! मणिबेन लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची कन्या. मणिबेनचा जन्म ३ एप्रिल १९०३ रोजी झाला. मणिबेनचं दुर्दैव बघा. ती केवळ सात वर्षांची असतानाच तिचं मातृछत्र हरपलं. तिच्या पाठीवर तिला लहान भाऊ होता. त्याचंही संगोपन करण्याची आणि घर सांभाळण्याची जबाबदारी पोरवयातच तिच्यावर येऊन पडली.**

खरं तर तिचं खेळण्याचं वय. पण ती पडली सरदार पटेलांची लेक, तेवढीच खंबीर आणि परिस्थितीला धीरानं तोंड देणारी. आपल्या मुलांना सावत्र आईचा त्रास होऊ शकेल म्हणून सगळे म्हणत असतानाही आणि तरुण वय असतानाही सरदारांनी दुसरं लग्न केलं नाही. देशाचा संसार मात्र उत्तम सांभाळला. घरात लक्ष द्यायला त्यांना वेळ नसायचा. मणिबेननं ती जबाबदारी सांभाळली. मणिबेन सरदार पटेलांची लेक पण तिने त्यांची एखाद्या आईसारखी त्यांची काळजी घेतली. ती सदैव सावलीसारखी त्यांच्या सोबत राहिली. ती त्यांची व्यक्तिगत सचिवही बनली. त्यामुळे त्या काळातील काँग्रेसचे सगळे दिग्गज नेते तिला ओळखत असत. आपल्याला सरदार पटेलांचा देशासाठीचा त्याग माहिती असतो. त्यांनी सगळी ५६५ संस्थाने एकत्र करून स्वतंत्र भारतात सामील केली. त्यांची ही कामगिरी इतिहासात केवळ अजोड आहे. स्वतंत्र भारतावर हे त्यांचे मोठे उपकार आहेत. पटेलांनी आपल्या कारकिर्दीत जी जी आंदोलनं केली, सत्याग्रह केले, त्या त्या प्रत्येक प्रसंगात मणिबेन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी होती. सत्याग्रहींना ज्या वेळी इंग्रज सरकारने तुरुंगात डांबलं, त्या वेळी त्यांच्यात मणिबेनही होती. देशाच्या स्वातंत्र्यासाठी तिनेही खस्ता खाल्ल्या. ती आजन्म अविवाहित राहिली. देशासाठी आपले आयुष्य तिने वाहिले होते. तिच्या तरुणपणातील बराचसा काळ हा अहमदाबादच्या महात्मा गांधींच्या आश्रमात गेला होता. त्यामुळे गांधीजींच्या शिकवणुकीचा प्रभाव तिच्यावर आयुष्यभर राहिला. त्या तत्वांचे तिने पालन केले. साधेपणा, निर्मळ चारित्र्य, सेवावृत्ती हे तिचे गुण सदैव अनुकरणीय असेच होते.

सरदार पटेल आपल्या आयुष्याच्या अखेरीस अतिशय आजारी होते. त्यावेळी अनेक नेते त्यांना भेटायला यायचे. त्यांचे स्वागत करणे, त्यांना आपल्या पित्याच्या आजारपणाची माहिती देणे ही जबाबदारी साहजिकच मणिबेनवर यायची. एकदा असेच काँग्रेसचे एक मोठे नेते महावीर त्यागी सरदार पटेलांना भेटायला आले. मणिबेनने त्यांचे स्वागत केले आणि त्यांना पटेलांच्या तब्येतीची माहिती दिली. मणिबेनच्या वागण्याबोलण्यात साधेपणा, सच्चेपणा ठासून भरला होता. स्वाभिमानी आणि संस्कारी पित्याचे रक्त तिच्यात खेळत होते. मणिबेन जिथे जिथे जायची तिथे तिथे चरखा आपल्यासोबत घेऊन जायची. त्यावर स्वतः सूत कातायची. तेच खादीचे साधे वस्त्र ती परिधान करायची. वडिलांच्या आजारपणामुळे आपल्या वस्त्रांकडे लक्ष द्यायलाही तिच्याकडे वेळ नव्हता. तिची साडी साधी स्वच्छ पण ठिकठिकाणी ठिगळे असलेली अशी होती. महावीर त्यागी तिला म्हणाले, ' तू सरदार पटेलांची मुलगी आहेस. सरदार पटेलांची या देशात वेगळी प्रतिमा आहे. सगळी संस्थाने एकत्र करून त्यांनी सम्राट अशोक किंवा अकबर यांच्यापेक्षाही मोठे असलेले राज्य देशाला केवळ वर्षभरात मिळवून दिले आहे. अशा पित्याची तू कन्या. तू अशी वस्त्रं परिधान करतेस. त्याची थोडीतरी लाज वाटू दे. जरा आपल्या पित्याचा विचार कर. यावर मणिबेनने जे तेजस्वी शब्द सगळ्यांना ऐकवले ते अक्षरशः सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावेत असे आहेत. ती म्हणाली, ' त्यात कसली आलीय लाज ? लाज तर त्यांना वाटली पाहिजे की जे लोक खोटं बोलतात, ढोंगी, लबाड आणि स्वार्थी आहेत, बढाया मारतात. माझ्या वडिलांची सरदार म्हणून देशात असलेली प्रतिमा ही त्यांच्या पैशामुळे नाही तर त्यांच्या कार्यामुळे आणि देशाप्रती असलेल्या निष्ठेमुळे आहे. माझ्या वडिलांनी मला नैतिक मूल्ये पाळून जीवन कसं जगता येतं ते शिकवलं आहे. त्यासाठी पैशांची आवश्यकता नसते. माणूस साधेपणानं सुद्धा आपलं जीवन जगू शकतो. त्यासाठी महागडी वस्त्रं वापरण्याची आवश्यकता नसते. आवश्यकता आहे ती सच्चेपणाची. आपण फक्त स्वतःशी प्रामाणिक असलं पाहिजे. ' मणिबेनचे हे बाणेदार तेजस्वी शब्द ऐकून महावीर त्यागी आणि त्यांच्यासोबत आलेले इतर काँग्रेस नेते कमालीचे ओशाळले आणि ते मणिबेनपुढे नतमस्तक झाले. सरदार पटेलांना जेव्हा ही घटना कळली, तेव्हा त्या आजारपणातही त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित झळकले. भारतातील गरीब शेतकऱ्यांबद्दल सरदार पटेलांच्या मनात नेहमीच सहानुभूतीची भावना असायची. त्यांना जिथे जिथे मदत करता येईल, तिथे तिथे ते आवर्जून करायचे. ज्यांनी दुग्धव्यवसायात क्रांती घडवून आणली असे धवलक्रांतीचे प्रणेते वर्गीस कुरियन यांनी आपल्या ' I TOO HAD A DREAM या पुस्तकात सरदार पटेल आणि मणिबेन यांच्याबद्दल फार महत्वाची माहिती दिली आहे. ज्यावेळी दुग्धोत्पादक शेतकऱ्यांची अडवणूक होत होती अशा वेळी गुजरातमधील कैरा जिल्ह्यातील शेतकरी पटेलांना भेटले होते. त्यावेळी पटेलांनी मोरारजीभाई देसाई या सहकाऱ्यावर त्यात लक्ष घालण्याची जबाबदारी सोपवली होती. मोरारजीभाईंनी पुढे काँग्रेसचे एक नेते त्रिभुवनदास यांच्यावर ती जबाबदारी सोपवली. यावेळी गुजरातमधील ' आणंद या ठिकाणी जी दुग्धव्यवसायाशी संबंधित संस्था होती, त्या संस्थेत मणिबेन नियमितपणे जातायेत असत. सरदार पटेलांचीच कन्या असल्याने तिलाही शेतकऱ्यांच्या प्रश्नात रस होता. मात्र आपण एका मोठ्या नेत्याची कन्या आहोत असा रुबाब त्यांनी कधीही मिरवला नाही. वर्गीस कुरियन यांच्या घरातील तर त्या जणू एक सदस्य झाल्या होत्या. कुरियन यांची पत्नी मॉली हिच्यावर त्यांनी आईसारखी माया केली. त्या मॉलीला सांगायच्या, ' तू वर्गीस यांची दुसरी पत्नी आहेस. त्यांची पहिली पत्नी म्हणजे त्यांची डेअरी, त्यांचं काम. त्यात तू कधीही अडथळा आणू नकोस. '



वर्गीस कुरियन यांनी आपल्या पुस्तकात पुढे मणिबेनबद्दल जे लिहिले आहे, ते वाचून त्यांच्याबद्दल हळहळ वाटल्याशिवाय राहत नाही. मणिबेन सरदार पटेलांच्या कायम सोबत असायची. सरदार पटेल जेव्हा आजारी झाले आणि जेव्हा आपल्या जीवनाचा शेवट जवळ आला आहे अशी जाणीव त्यांना झाली, तेव्हा त्यांनी मणिबेनजवळ दोन वस्तू दिल्या. या दोन गोष्टी आपल्या मृत्यूनंतर तिने फक्त पं, नेहरूंनाच द्याव्यात असे त्यांनी सांगितले. त्या दोन वस्तू कोणत्या होत्या ? त्यातील एक वस्तू म्हणजे एक काँग्रेसची खातेवही होती. दुसरी वस्तू म्हणजे एक बॅग होती. त्या बॅगेत थोडीथोडके नव्हे तर चक्क ३५ लक्ष रुपये होते. तो काळ होता डिसेंबर १९५० चा. आजच्या घडीला त्या रकमेची किंमत कदाचित अनेक कोटी होईल. सरदार पटेल यांचं १५ डिसेंबर १९५० ला निधन झालं. त्यानंतर त्या प्रामाणिक, देशभक्त पित्याची ही कन्या त्या दोन्ही वस्तू घेऊन पं. नेहरूंच्या भेटीसाठी गेली. त्यावेळी नेहरूंनी त्या दोन्ही वस्तू ठेवून घेतल्या. त्यांनी मणिबेनला फक्त ' धन्यवाद ' म्हटले. मणिबेन त्या ठिकाणी बराच वेळ बसून होत्या. पण नंतर नेहरू काहीही न बोलल्यामुळे त्या तेथून परत निघाल्या. त्या वेळी देशाचे गृहमंत्री आणि उपपंतप्रधान असलेल्या पटेलांच्या या कन्येची आर्थिक स्थिती कमालीची खालावली होती. पटेलांच्या मृत्यूनंतर मणिबेन यांनी बिर्ला भवनमध्ये राहायला यावे अशी विनंती बिर्ला यांनी केली होती पण स्वाभिमानी मणिबेनने ती नाकारली. त्या अहमदाबाद येथे आपल्या नातेवाईकांकडे राहायला गेल्या. आर्थिक स्थिती हलाखीची असतानाही ३५लक्ष रुपयातील एका पैशालाही हात न लावणारे सरदार पटेल आणि तेवढ्याच निरपेक्षतेने ते पैसे पं. नेहरूंना नेऊन देणारी त्यांची कन्या मणिबेन यांच्या त्याग आणि निरिच्छ वृत्तीबद्दल बोलण्यासाठी शब्द कमी पडतात. महात्मा गांधी आणि पं. नेहरू यांच्या पाठीशी कठीण परिस्थितीत उभे राहून त्यांना सदैव साथ देणाऱ्या सरदार पटेलांच्या कन्येची आस्थेवाईकपणे साधी चौकशी करण्याचे सौजन्य सुद्धा त्यावेळी दाखवली गेले नाही. मदत करणे तर दूरचाच भाग ! सरदार पटेलांना सत्तेची हाव कधी नव्हतीच. देशासाठीच त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले होते. काँग्रेस कमिटीने आणि पंधरापैकी बारा प्रदेश काँग्रेस कमिट्यानी पंतप्रधान म्हणून आपला भरभरून पाठिंबा पटेल यांच्या नावाला दर्शवला होता. पण नेहरूंसाठी गांधीजींच्या शब्दाखातर पटेलांनी आपली उमेदवारी मागे घेतली. आपल्या पश्चात आपल्या कन्येला अशी वागणूक मिळालेली पाहून स्वर्गात गेलेल्या सरदार पटेल यांच्या आत्म्यालाही ' हेचि फळ काय मम तपाला ' असे वाटले असेल. पण अर्थात काही मिळेल या आशेने काम करणारी ही मंडळी नव्हतीच. त्यांच्या त्यागाचा कोणताच मोबदला त्यांना नको होता.

पुढे त्रिभुवनदास यांच्या प्रयत्नातून मणिबेन लोकसभेवर निवडून आल्या. त्या तीन वेळा लोकसभा तर एकदा राज्यसभा सदस्य राहिल्या. संसद सदस्य म्हणून त्यांना प्रथम वर्गाचा रेल्वेचा पास मिळाला होता. पण गांधीवादाचे संस्कार अंगात भिनल्याने आणि साधेपणाची सवय असलेल्या मणिबेन यांनी नेहमीच तिसऱ्या वर्गाने प्रवास केला. वर्गीस कुरियन यांच्यासोबत त्या मोरारजी देसाई यांना भेटायला जात असत. पण ज्या सरदार पटेलांनी आपला अनुयायी म्हणून मोरारजींना महत्वाचे स्थान दिले, त्याच मोरारजींनी मणिबेन यांना तासनतास बसवून तिष्ठत ठेवले. त्यांची भेट घेणे किंवा त्यांच्याशी दोन प्रेमाचे शब्द बोलण्याचे औदार्य मोरारजींनी कधीच दाखवले नाही. एका सच्च्या देशभक्ताची सच्ची देशभक्त असलेली ही कन्या आपल्या आयुष्याच्या अखेरीस अत्यंत विपन्नावस्थेत जीवन जगली. अहमदाबादच्या रस्त्यावरून ती एकटीच पायी फिरताना बऱ्याच वेळा आढळून येई. कधी कधी दृष्टी क्षीण झाल्यामुळे ती अडखळून पडत असे. कुणीतरी येणारा जाणारा तिला आधार देऊन उठवत असे. २६ मार्च १९९० या दिवशी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री असलेले चिमणभाई पटेल यांना जेव्हा ही बातमी कळली, तेव्हा त्यांनी एका छायाचित्रकाराला बोलावले आणि मणिबेनच्या शेजारी उभे राहून आपला फोटो काढून घेतला. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रात हा फोटो झळकला. देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या पित्याच्या भेटीसाठी ही तेवढीच देशभक्त असलेली कन्या निघून गेली. तिच्या त्याग आणि सेवेचा आदर्श मागे ठेवून !

# आपेगावात अनुभवला बहीण- भावाच्या प्रेमाचा क्षण

## माऊलीसाठी आली आपेगावी मुक्ताईची राखी

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** बहीण-भावाच्या नात्याचा पवित्र सण म्हणजे रक्षाबंधन. या पवित्र धाग्याचे नाते जपत मुक्ताईनगर येथील संत मुक्ताबाई संस्थांच्या वतीने दरवर्षी संतश्रेष्ठ ज्ञानोबाराय, तसेच संत निवृत्तीनाथ व सोपानकाका यांना दरवर्षी राखी पाठवण्याची परंपरा याही वर्षी संस्थांनी कायम ठेवली. संत ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या आपेगाव येथे दरवर्षी संत मुक्ताबाई संस्थानकडून आपल्या तीनही भावंडांना राखी पाठवली जाते.

मागील काही वर्षांपासून ही परंपरा संस्थाने कायम ठेवली असून, मुक्ताई संस्थांकडून बहीण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या राखीच्या धाग्याने ही संस्थाने केवळ जोडली गेलेली नसून, प्रेमाचा ओलावाही निर्माण झाल्याची माहिती सेवेकरी भागवत पाटील यांनी दिली. समाजाकडून झालेल्या त्रासाला कंटाळून झोपडी बंद करून बसणाऱ्या ज्ञानदेवाना उपदेश करत निराशेच्या गर्गेतून बाहेर काढणाऱ्या मुक्ताई मुळेच ज्ञानदेव संत झाले आणि त्यांनी जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले.

अशा या लहानग्या मुक्ताईचे भगिणी प्रेम मुक्ताईनगर संस्थानने केले आहे. या संस्थानकडून संत मुक्ताईच्या वतीने भाऊ संत ज्ञानदेवासाठी ज्ञानेश्वर महाराज संस्थान आपेगाव जन्मगावी परंपरेने राखी अर्पण केली आहे. बहिण भावाच्या गोड आणि अनोख्या परंपरेची अवघ्या आपेगावकरानी शेकडो वर्षानंतरही अनुभवले असेच म्हणावे लागेल मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष भैय्यासाहेब ऊर्फ रविंद्र पाटील यांनी ही परंपरा जपली असुन संस्थानच्या वतीने सेवेकरी साधनाताई भागवत पाटील, अश्विनी महेंद्र पाटील या भगिनींनी आपेगाव येथे येवून संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील माऊलीला राखी बांधुन भाऊ बहिणीच्या या रक्षाबंधनाच्या सणाला उजाळा दिला.

याप्रसंगी मुक्ताई संस्थानच्या वतीने भागवत पाटील, महेंद्र पाटील, मेवुन संस्थानच्या वतीने सारंगधर महाराज तर आपेगाव संस्थानच्या वतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर, भागवताचार्य शिवाजी महाराज सेलुकर, रामभाऊ औटे, आन्नासाहेब माली पाटील, भीमराव औटे, एकनाथ नरके सर, ग्रामविकास अधिकारी जिजासाहेब मिसाळ, संतोष थोरात, तात्यासाहेब मोरे, ज्ञानेश्वर मिसाळ, आगरनांदुरचे सदस्य मनोहर थोरात, लक्ष्मण कोल्हे उपस्थित होते.





# बाजार सावंगी येथे ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** विद्यार्थी प्रेरणा परीक्षा 2023 ते 2024 आयोजन शिक्षण संचालक कार्यालय औरंगाबाद तसेच शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात येत आहे.

यासंदर्भातविद्यार्थी प्रेरणा परीक्षा 2023 ते 24 उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लेखन कौशल्य अचूक व गतीने प्राप्त होण्याच्या दृष्टीने आयोजित विषय सराव परीक्षेच्या संदर्भात ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी येथे विद्यार्थ्यांना परीक्षेचा तपशील कसा असेल पहिली घटक चाचणी, दुसरी घटक चाचणी, प्रथम सराव परीक्षा, द्वितीय सराव परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा व JEE, NEET, व MH CET संदर्भात विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आलेयायाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झुंजुर्के प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड, भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव,श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाल बाबा यांची उपस्थिती होती.

# एचआयव्ही जनजागृतीसाठी युवकांच्या विविध स्पर्धांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** अजूनही समाजात पाय रोवून बसलेला एचआयव्ही /एड्स आपले ठाण मांडून आहे, याचे समूळ उच्चटन व्हावे तसेच या बाबत जन जागृती व्हावी यासाठी राज्यभर विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत,नुकताच १२ऑगस्ट ते२६ऑगस्ट हा पंधरवडा संपूर्ण राज्यात आंतरराष्ट्रीय युवक दिन म्हणून संपन्न झाला. या पूर्ण पंधरवड्यात औरंगाबाद जिल्हाभर विविध उपक्रम राबवून या एचआयव्ही बाबत युवा वर्गात मोठ्या प्रमाणात जनजागृती करून त्यांनाही या जनजागृती उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स व प्रतिबंध केंद्र, जिल्हा रुग्णालय औरंगाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने १८ते २५ वयोगटातील



विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी मॅरेथॉन स्पर्धा, मार्गदर्शन शिबीर, संवाद शिबिर, वैजापूर व औरंगाबाद या ठिकाणी आयोजित करून मोठया प्रमाणात एचआयव्ही एड्सबाबत जनजागृती करण्यात आली. मॅरेथॉन स्पर्धेचे उदघाटन कुलसचिव भगवान साखळे यांनी हिरवा ध्वज दाखवून केले. या स्पर्धेत रेड रिबन क्लब, विद्यापीठिय व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. विजयी स्पर्धकांना पारितोषिके व प्रमाण पत्र देण्यात आली. प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे यांनी करून एचआय व्ही -एड्स बाबत माहिती देऊन जागृती करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी जिल्हा रुग्णालय चे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोती पवळे, कार्यक्रम समन्वयक डॉ. सोनाली क्षीरसागर, एस. एस. डॉ. फुलचंद सलामपुरे, जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत, तांत्रिक अधिकारी विनोद म्हस्के व डापकुचे कर्मचारी उपस्थित होते.



# मोठीजुई शाळेत 'बंदरावरची शाळा' या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात अग्रेसर असणारी एकमेव शाळा म्हणजे मोठीजुई शाळा आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानरचनावादाला सतत प्रोत्साहन देते आणि याच ज्ञानरचनावादाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मोठीजुई येथे रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा निमित्ताने बंदरावरची शाळा या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नारळीपौर्णिमा म्हणजे श्रावणी पौर्णिमा.हा दिवस म्हणजे समुद्रा विषयी कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्याचा दिवस.बंदरावरची शाळा या उपक्रमातंर्गत इयत्ता ३ री ते ७ वी च्या पाठ्यपुस्तकातील अनेक घटकांची प्रत्यक्ष समुद्रावर जाऊन उपलब्ध साहित्याच्या आधारे विद्यार्थ्यांनी स्वतः माहिती घेतली. यामध्ये देशातील बंदराची माहिती,भरती - ओहोटी, उधानाची भरती,भांगाची भरती, सागर संपत्ती,महासागर तळरचना, लाटनिर्मिती, त्सुनामी निर्मिती,सागर प्रदूषण समस्या व उपाय, विविध प्रकारच्या मासे व मासे पकडण्याच्या साहित्यांची माहिती माहिती मुलांना देण्यात आली. विद्यार्थी स्वतः सहभागी असल्याने समुद्राविषयीची भिती दूर होऊन त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला ,त्याचबरोबर पारंपारिक सण व समुद्राला आळवणी करण्यासाठी पारंपारिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांकडून समुद्राची पुजा करून नारळ वाहण्यात आला. सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संजय होळकर, उपक्रमशील शिक्षक कौशिक ठाकूर, विषय शिक्षक दर्शन पाटील, सुरेखा खराटे, यतीन म्हात्रे, अंकुश पाटील आदींनी विशेष मेहनत घेतली.



# सोयाबीन पिकांवर पान अळीचा प्रादुर्भाव

## शेतकरी हवालदिल : कृषी विभागाने मार्गदर्शन करावे : प्रा.मदन डोखळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात व तालुक्यात



यंदा पावसाने विलंब केला असला तरी सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी योग्य ते नियोजन करीत खरिपातील पेरणी पूर्ण केली. पेरणीनंतर पाऊस देखील काही भागात मेहरबान असल्यामुळे पिके देखील जोमात आहे.मात्र सोयाबीन पिकावर सध्या मोठ्या प्रमाणात रोगाचा प्रादुर्भाव झाला असल्याने ही अळी संपूर्ण झाडच उध्वस्त करीत असल्याने शेतकरी हवालदील झाले आहे. त्यामुळे शेतकरी या रोगाला आटोक्यात आणण्यासाठी विविध औषधी फवारणी करीत असल्याचे चित्र सध्या शेत शिवारात दिसत आहे. दरम्यान पिकावर तणनाशक व ईतर कीटकनाशकाची फवारणी करताना शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घेण्याचे सोयगाव आवाहन कृषी विभागाकडून मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात यावे असे आवाहन प्रा मदन डोखळे डाभा यांनी केले आहे. सोयगाव तालुक्यात यंदा सुरूवातीपासुन दमदार पावसाची प्रतिक्षा असली तरी शेतकऱ्यांनी समाधानकारक पावसावर जवळजवळ बेचाळीस हजार हेक्टरवर कपाशी, सोयाबीन, मका, उडीद, मुग, तुर, ज्वारी आदी पिकांची पेरणी केली आहे.



सोयगाव तालुक्यात खरीप हंगामातील सोयाबीन पिकांवर वेगवेगळ्या रोगाच्या प्रादुर्भावाने ग्रहण लागल्याने शेतकरी वर्ग डोक्याला हात लावीत आहे. त्यात वरुणराजाने डोळे मिटून घेतले आहे. खरीप हंगाम तसा शेतकरी वर्गाला अत्यंत खडतर प्रवास करून घ्यावा लागत आहे. रब्बी हंगामाचे नुकसान भरून काढण्यासाठी बळीराजांने खरीप हंगामासाठी चांगली कंबर कसली होती. त्यासाठी शेतकरी वर्गाने या हंगामात नगदी भांडवल देणारे पिक लागवडीसाठी पसंती दिली. त्यात कपाशी, सोयाबीन, मका, मुग, उडीद, व इतर पिके घेण्यावर अधिक भर दिला. परंतु याही हंगामाने बळीराजांच्या समोरील समस्या कमी न करता त्या वाढल्याने शेतकरी वर्ग हवालदील झाला आहे. यंदा सोयाबीनच्या झाडाची वाढ मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे त्यांचा परिणाम उत्पन्न वाढीवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच सोयाबीन पिकाची पाने कुर्तडणारी आळी सोयाबीनची पाने खात असून ती पानाची पुर्ण चाळणी करीत आहे. यासाठी शेतकरी वर्गाला अत्यंत महागडे किंमतीचे औषधांची खरेदी करून त्याची वेळोवेळी फवारणीकरावी लागत आहे. यासाठी शेतकरी वर्गाची धावपळ सुरू झाली आहे. तरी सोयगाव कृषी विभागाने येऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन प्रा. मदन डोखळे पाटील डाभा यांनी केले आहे.

मागील हंगामात शेतकरी वर्ग वातावरणातील बदलावामुळे व अस्मानी व सुलतानी संकटाचा सामना करीत पिकाचा हंगाम घेतो .परंतु या विविध संकटामुळे प्रमाणापेक्षा जास्त भांडवल खर्च होऊन ही उत्पन्न काहीच मिळत नाही . सोयाबीन पिकांवर यंदा विविध संकटाचा विळखा पडल्यामुळे सोयाबीनवरील आमची आशा मावळली जाण्याची भीती निर्माण झाली आहे .

**गोपीनाथ काशीनाथ पुजारी, शेतकरी सावळदबारा**

सोयाबीनचे पीक सध्या फुलोरा, शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे . परिसरातील अनेक भागातील सोयाबीनवर पाने खाणारी लष्करी अळी, उंट अळी, केसाळ अळी आदींचा प्रादुर्भाव आढळून येत आहे . अनेक भागात चक्री भुंगा तसेच कोवळ्या शेंगावर घाटे अळीचा प्रादुर्भाव देखील आढळून येत आहे .

**सौ . अलकाबाई गोकुळसिंग चव्हाण, शेतकरी सावळदबारा**

# दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांना पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राखी पौर्णिमेच्या दिवशी दागिने हिसकावणाऱ्या पाच चोरट्यांना पर्वती पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आले असून, सात लाखांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. चोरट्यांविरुद्ध जळगाव, अकोला, पुणे, अमरावती शहरात दागिने हिसकावण्याचे ३० गुन्हे दाखल आहेत. राखी पौर्णिमेला दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांना पकडून पोलिसांनी अनोखी भेट दिली. आकाश ज्ञानेश्वर सूर्यवंशी (वय २५, रा. दत्तनगर, कात्रज), लोकेश मुकुंदा महाजन (वय २४), प्रसाद उर्फ परेश संजय महाजन (वय २५), संदीप अरविंद पाटील (वय २८), दिपक रमेश शिरसाठ (वय २५ , सर्व रा. जळगाव) अशी अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. रिक्षा प्रवासी महिलेचे दागिने पर्वती भागातून हिसकावून नेल्याची घटना २४ ऑगस्ट रोजी घडली होती. याचदिवशी सदाशिव पेठेत पादचारी महिलेचे दागिने दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेले होते. या गुन्ह्याचा तपास पर्वती पोलिसांकडून करण्यात येत होता. सहायक पोलीस आयुक्त अप्पासाहेब शेवाळे यांनी तपास पथकांना चोरट्यांचा माग काढण्याचे आदेश दिले होते. पोलीस उपनिरीक्षक सुनील जगदाळे, चंद्रकांत कामठे यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले होते. पोलीस कर्मचारी किशोर वळे यांना चोरट्यांच्या माहिती मिळाली. चोरटे शिवाजीनगर भागातून प्रवासी बसने जळगावला पसार होण्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा लावून चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले. चोरट्यांनी भारती विद्यापीठ, बिबवेवाडी, सहकारनगर, विश्रामबाग पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महिलांचे दागिने हिसकावल्याची कबुली दिली.



# चिमुकल्यांनी बांधल्या पोलिस बांधवांना राख्या

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** हिंदु धर्मातील श्रावण महिन्यातील नारळी पौर्णिमेच्या दिवशी येणारा बहीण भावाचे अतुट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस! हा रक्षाबंधन हा सण होय या सणाच्या दिवशी येथील केंद्रीय कन्या प्राथमिक शाळेतील ईयत्ता ५वी ते ७वी च्या चिमुकल्यांनी समाजाच्या सुरक्षारक्षक व रक्षणकर्त्यांप्रती राखी बांधून कृतज्ञता व्यक्त केली. या स्तुत्य उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

रक्षाबंधनच्या दिवशी विद्यार्थ्यांनी येथील पोलीस स्टेशनला भेट दिली. क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश पोलीस स्टेशन मधील कामकाज कसे चालते हे पाहणे व समाजात शांतता व सुव्यवस्था स्थापित करण्यासाठी पोलिसांची भूमिका समजून सांगणे हे होते. केंद्रीय कन्या प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी पोलीस स्टेशनला पोहोचले. तिथे पोहोचल्यावर येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विनोद साने यांनी या शिक्षणक्षेत्राशी संबंधित असलेले शाळेच्या बालगोपालांना पाहिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहताना दिसत होता.

त्यांनी परिणामस्वरूप विद्यार्थ्यांच्या मनातही पोलीस स्टेशन बद्दल यत्किंचितही भीती निर्माण न होता हसतमुखाने त्या परिसरात वावरत पोलीस बांधवांकडून वेगवेगळ्या यंत्रणेची व तसेच तेथील विविध शस्त्रांची, अस्त्रांची माहिती दिली व विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यानंतर स.पो.नि. बालाजी गायकवाड व सपोउपनि विनोद साने, सूर्यकांत केजगीर, ऊमेश बारहाते, गजानन रोकडे, पवन राऊत, दामीनी पथकाच्या ज्योती पोले, जिलानी शेख ,रमेश गिराम, एस.आर. वायाळ, माने, विलासराव चव्हाण, वसीम ईनामदार, रामभाऊ देशमुख यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित सर्व पोलीस बांधवांना या मुलीनी स्वतः बनवलेल्या राख्या बांधून त्यांच्याप्रती आदर व ऋण व्यक्त केले. विद्यार्थ्यांसोबत शााळेचे मुख्याध्याक माणिक चव्हाण, नारायण गडदे, ज्ञानदेव ननुरे यांच्यासह आदीं शिक्षक उपस्थिती होती.

# जि.प. केंद्रीय प्राथमिक इटोली शाळेची महादेव मंदिरावर दिंडी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** श्रावण सोमवार निमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटोली शाळेची शैक्षणिक क्षेत्र भेट म्हणून टाळ, मृदुंगाच्या गजरात हरहर महादेवच्या जयघोषाने व अभंगाच्या तालावरती सर्वांनी पावलीचा ठेका घेत विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक जवळजवळ ७ कि.मी. उंच डोंगरावर वसलेले डोंगरतळा येथील जागृत महादेवाचे स्थान असलेले रमणीय दाट झाडामध्ये लपलेलं जयशंभो मंदिरास अती उत्साही, आनंदाच्या भरात भेट दिली. या श्रावणमासी क्षेत्र भेटीने संपूर्ण परिसर मनमोहक करत श्रीराज मोहन कोद्रे या विद्यार्थ्यांनी महादेवाची वेशभूषा हुबेहूब साकारत सर्व भावीक भक्तांचे लक्ष वेधून घेतले तसेच शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना व भावीक भक्तांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले. क्षेत्रभेट यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक भास्कर जुमडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ मेनकुदळे, सहशिक्षक भास्कर चव्हाण, परमेश्वर मेनकुदळे, गणेश येलाले, नितीन कुकाले, बर्गे सर, मनू कोद्रे, कौशल्या नागरगोजे व राधा कोद्रे आदींनी परिश्रम घेतले.



# अतिवृष्टीची रखडलेली भरपाई लवकर द्या : दिनकर देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात शेतकऱ्यांचे अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने 7 एप्रिल 2023 ला प्रचंड नुकसान झालेले होते. त्यावेळेस सावळदबारा तलाठी व कोतवाल हे माझ्या शेतातून मका पिकाच्या नुकसानीचा पंचनामा करून सुध्दा गेले होते पण अद्यापही मला नुकसानीची रक्कम मिळालेली नाही. संबंधित कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता प्रोसेसमध्ये आहे सांगण्यात येते पण प्रोसेस काही पूर्ण होत नाही. ही नुकसान भरपाई प्रत्यक्षात मिळणार आहे की फक्त काही तरी पंचनामा करायचा म्हणून करायचा असा प्रश्नच मला पडलेला आहे. मी व परिसरातील इतर शेतकऱ्यांचे पण त्यावेळी प्रचंड नुकसान झालेले होते. त्यावेळी कोणाचे टिन शेड तर कुणाचे शेतातील मका पीक खाली पडलेले होते. तरी सुध्दा अद्यापही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्याचप्रमाने खरीप 2022-23 ची अतिवृष्टी ची ही फक्त घोषणाच दिसतेय अद्यापही रक्कम मला अदा करण्यात आलेली नाही त्यामुळे रखडलेली खरीप 2022-23 अतिवृष्टी व रब्बी 2022-23 अवकाळी पाऊस यांच्या मुळे झालेल्या नुकसानीची ही रक्कम शेतकऱ्यांना त्वरित अदा करण्यात यावी यासाठी दिनकरराव आबासाहेब देशमुख शेतकरी यांनी तहसीलदार हरणे यांच्याकडे मागणी केली आहे.

माझ्या शेतीचा गट क्रमांक २७६,१०८,२४७,२६० असा आहे . मागच्या वर्षी खरीप व रब्बी अतिवृष्ठी मुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे .त्यामुळे आपण स्वत : लक्ष घालून माझी खरीपाची व रब्बीची रक्कम जी माझ्या हक्काची आहे ती मला व तालुक्यातील रखडलेल्या सर्व शेतकरयांना लवकरात लवकर अदा करण्यात यावी असे निवेदन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांच्या कडे देण्यात आले आहे .





# अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

## बल्लारशा येथे २ लाख ३८ हजारांचा सुगंधी तंबाखू जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात आधिच प्रदूषणाने अनेक गंभीर आजारांनी तोंड वर काढले असतांनाच आणि सुगंधि तंबाखूच्या विक्रीवर राज्यात सर्वत्र बंदि असतांना चंद्रपूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी सुगंधि तंबाखूची विक्री खुलेआम होत आहे हे गेल्या काही दिवसांत सुगंधी तंबाखू विक्रीच्या आणि छाप्याच्या बातम्या सर्वत्र प्रसारीत होत असतांनाच आता पुन्हा चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा तालुक्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर विद्यानगर वार्ड येथील अशोक किराणा स्टोअर्स वर धडक कारवाई करून तब्बल २ लाख ३८ हजार रुपयांचा ९० किलो सुगंधी तंबाखू पकडला आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रफुल्ल टोपले , प्रविण उमप आणि गिरीश सातकर यांनी ही कारवाई करून माल ताब्यात घेतला आहे. बल्लारशा पोलीस स्टेशनला या प्रकरणाची रितसर



तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीच्या आधारावर पोलीस विभागाने अशोक किराणा स्टोअर चे अशोक बांबोळे यांना अटक करण्यात आली आहे.

बल्लारशा येथे सुगंधी तंबाखूची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून यातील केवल चिल्लर विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येत आहे . परंतू या व्यवसायातील मोठे ढोक व्यापारी यांच्यावर पोलीस विभाग कधी कारवाई करण्यात येईल ? असा प्रश्न आता बल्लारशा मधे विचारल्या जात असून या बड्या व्यापाऱ्यांमधे कन्नू या मोठ्या व्यापाऱ्याचे नाव समोर येत असून हा कन्नू कोण व त्यापर्यंत पोलीस कधी पोहोचणार असाही प्रश्न आता चौकाचौकात चांगलाच चर्चिल्या जात आहे .

यासंदर्भात बल्लारशा पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी या प्रकरणात अशोक बांबोळे यांना अटक करण्यात आली असून आज त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे सांगितले. पुढील तपास बल्लारशा पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे. शिवाय किराणामाल दुकानातून सुगंधि तंबाखू विक्री करत असल्याने या दुकानावर आता अन्न व औषध प्रशासन विभाग काय कारवाई करेल याकडेही सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामीण भागात इंटरनेटचा वेग मंदावला; नेटवर्कची समस्या

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील गेल्या काही महीमहिन्यापासू सर्वच मोबाईल कंपन्यांच्या नेटवर्कच्या समस्येने मोबाईल फोन (सिम कार्ड धारक) ग्राहक हैराण झाले आहेत. ग्रामीण भागातील नेटवर्कची समस्या आणखी बिकट आहे. सर्वच कंपन्यांकडून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आकर्षक ऑफर्स दिल्या जात आहेत. दुसरीकडे सर्वच कंपन्यांचे मोबाईल नेटवर्क कोलमडे आहे. इंटरनेट मीडियाच्या वेगाने वाढणाऱ्या ट्रेंडमुळे इंटरनेट मीडिया हे प्रत्येकाच्या माहितीचे आणि इतर देवाणघेवाणीचे मुख्य केंद्र बनले आहे. अशा परिस्थितीत नेटवर्कच्या समस्येमुळे लोकांना खूप मोठा संघर्ष करावा लागतो. इंटरनेट सेवा नीट काम करत नाही तसेच परिसरात एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी नेटवर्कची समस्या आहे. मोबाईलचे नेटवर्क इतके खराब झाले आहे की बोलत असताना लाईन कट होते किंवा कुठेतरी कनेक्ट होते, बोलत आसतांना एकमेकांचा आवाज ऐकु येत नाहीत अशा स्थितीत नेटवर्कबाबत लोकांमध्ये मोठी समस्या निर्माण झाली आहे. ४ जी व ५च्या युगात नेटवर्क सेवा २ जी सेवेप्रमाणे काम करत असल्याचे ग्राहकांनी सांगितले. संथ इंटरनेट सेवेमुळे काही साइट्स उघडता येत नाहीत.

# हजरत जर जरी जर बक्ष व्यवस्थापन समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील हजरत जर जरी जर बक्ष रहे च्या उरुस 22 /सप्टेंबर पासून सुरू होणार असून नियोजना निमित्त व्यवस्थापन समितीची बैठक उपजिल्हाधिकारी संतोष गोरड यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषद सभागृहात संपन्न झाली.

हे उरुस एकतेचे प्रतिक असुन लाखो भाविक येतात आणि हे उरुस महिना भर चालतात. या बैठकीत उरुसच्या काळात वीज पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्याचा निर्देश देण्यात आले, आरोग्य विभागाला सर्व प्रकारच्या औषधे विशेष करून सर्प दंशाचे व कुत्रे चावल्यानंतरचे इंजेक्शन जास्तीत जास्त ठेवण्याचे आदेश देण्यात आले, सार्वजनिक बांधकाम विभागाला सर्व रस्ते दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले, नगर परिषदेला पिण्यायोग्य चाचणी करून पाणी पुरवठा सुरळीत करणे, उरुस मैदानात व शहरात औषधेची फवारणी करून साफसफाई वर जास्त लक्ष देण्याची सूचना देण्यात आली. पोलीस विभागला वाहतूक कोंडी होणार नाही विशेष ईद मिलादुननबी च्या दिवशी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात यावे. सी. सी कॅमेरे बसविण्यात यावे अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावे. अशी सुचना देण्यात आली. यावेळी तहसीलदार स्वरुप कंकाड, पोलीस निरीक्षक हातमोडे, मुख्याधिकारी विक्रम दराडे, उरुस व्यवस्था समिती सदस्य अबरार वसीयोद्दीन मुजावर, माजी नगराध्यक्ष सलीम कुरैशी, काँग्रेस शहर अध्यक्ष अब्दुल समद टेलर, माजी नगराध्यक्ष एस एम कमल, शिवसेना शहर प्रमुख विष्णु फुलारे, काँग्रेस शहर उपाध्यक्ष ईकरामोद्दीन अमीरोद्दीन , एमआयएम अध्यक्ष अब्दुल मजीद मान्यार, भाजप शहर अध्यक्ष सतीश दांडेकर, कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र बोचरे तलाठी बंडु आवाड आणि सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.





# अण्णा भाऊ साठेंचे साहित्य अनमोल ठेवा

## शिवा कांबळे : भोकरला जयंतीनिमित्त व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी शेतकरी, शेतमजूर, कामगाराच्या हितासाठी लढा ऊभखरला. वेदनेच्या पाऊलवाटा तूडवीत त्यांनी उपेक्षितांना न्याय मिळवून दिला. यातूनच त्यांना अस्सल साहित्य निर्माण करता आल. त्याचं साहित्य एक अनमोल ठेवा आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती पूरस्कार प्राप्त शिक्षक तथा साहित्यिक शिवा कांबळे यांनी मंगळवारी (ता. २९) केल आहे.

शहरातील मोंढा परिसरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. बाजार समितीचे सभापती जगदीश पाटील भोसीकर अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भगवान दंडवे, संदीप गौड पाटील,ॲड.शिवाजी कदम,राजू अंगरवार,मनोज गिमेकर यांची उपस्थिती होती.श्री.कांबळे म्हणाले की, महिन्याभरापासून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. केवळ जयंती साजरी करून चालणार नाही तर ज्या महापुरुषानी शोषीत, पीडीत समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले त्यांचे साहित्य प्रत्येकाच्या घराघरात असणं गरजेचं आहे. मानवताभाव असलेलं साहित्य हृदयाला पाझर फोडणारे आहे.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिल. शिक्षण हे वाघीनीच दूध आहे जोकोणी प्राशन करील तो गुरगूरल्या शिवाय राहणार नाही असे सांगितले. आजची यूवापिढी दिवसेंदिवस व्यसन आणि मोबाईलच्या आहारी गेल्याच दिसून येत आहे. यातून वेळीच सावरले तरच भविष्याची वाटचाल यशस्वी होईल अन्यथा नाही, असे सांगितले आहे.

उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.कार्यक्रम यशस्वितेसाठी अविनाश वाघमारे,दिलीप वाघमारे, बालाजी वाघमारे,राहूल शेळके, के.वाय .देवकांबळे,रवी कीनीकर, सखाराम मोरे, पांडुरंग सूर्यवंशी,गणपत सुयशकर, साहेबराव भालेराव, बालाजी वाघमारे,बबलू काळे, साहेब झुंझारे यांनी परिश्रम घेतले आहे.कार्यक्रमास बहुसंख्य महिला,नागरीकखची उपस्थिती होती.सुत्रसंचलन सखाराम वाघमारे यांनी केले,अनील डोईफोडे यांनी आभार मानले आहे.

लगेचच व्याख्याना नंतर साहेबराव पूयड पाटील पुणेगावकर निर्मित शिवगंगा संगीत संचाने अण्णा भाऊ साठे यांच्या एकापेक्षा एक सरस गीतानी रसिकांना खिळवून ठेवले.मूख्यआकर्षण जूनीअर जॉनीलिव्हर रामेश्वर भालेराव यांनी विनोद व दिलेखेच अभिनयाने उपस्थितांचे मनोरंजन केले.



# कर्म. आ. मा. पाटील महाविद्यालयात जागतिक उद्योजकता दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** शेळीपालन, कुक्कुटपालन व इतर कोणताही उद्योग व्यवसाय करायचा असेल तर त्याला नियोजन, मेहनत घेणे गरजेचे असते असे प्रतिपादन डॉ.मिलिंदराज बर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.के.डी. कदम हे होते. विचारमंचावर प्रो. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. डॉ.सतीश मस्के प्रा. डॉ. वाय.एम. नांद्रे हे होते. कर्म.आ.मा. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात करिअर कट्टा व आय.क्यु. ए.सी. संयुक्त विद्यमाने शासनाच्या व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार ' जागतिक उद्योजकता दिन' साजरा करण्यात आला. या या कार्यक्रमात बोलताना प्रमुख मार्गदर्शक वार्सा येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.मिलिंदराज बर्डे म्हणाले की, उद्योग व्यवसाय हा एक मानवी जीवन उंचावण्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामध्ये शासनही उद्योग करणाराला सबसिडी देऊन मदत करते. शेळीपालन, कुक्कुटपालन, गोपालन, मच्छि पालन व इतर व्यवसायाच्या संदर्भात उपयुक्त ती माहिती दिली. त्याचबरोबर त्यांचे अन्न, आजार, घ्यावयाची काळजी याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवोपक्रम,नवसंशोधन मंडळ प्रमुख प्रो. डॉ. बी.सी.मोरे यांनी केले. आभार प्रा. डॉ.वाय.एम.नांद्रे यांनी मानले.

# एम. आय. टी. राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वडूज शहर महिला समन्वयकपदी मिलिंदा पवार

आधुनिक केसरी न्यूज

**वडूज :** एम. आय. टी. . राष्ट्रीय सरपंच संसदेच्या सातारा जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना नुकतीच नियुक्ती पत्र प्रदान सोहळा साताऱ्यात संपन्न झाला. यामध्ये राष्ट्रीय सरपंच संसदेच्या वडूज शहर महिला समन्वयकपदी मिलिंदा पवार यांची नियुक्ती करण्यात आली असून मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

एम. आय. टी. राष्ट्रीय सरपंच संसदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, सहसमन्वयक प्रकाशराव महाले, पुणे विभागीय महिला समन्वयक श्रीमती भक्ती जाधव सातारा जिल्हाध्यक्ष विक्रम जाधव यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात मिलिंदा पवार यांना वडूज शहर महिला समन्वयक पदाची जबाबदारी या मान्यवराच्या हस्ते देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सरपंच संसदेच्या स्वाती चव्हाण, अनिता जाधव, प्रतिभा शिर्के, स्वाती ढाणे, वैशाली भिलारे तसेच जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. मिलिंदा पवार यांनी लेखणीच्या माध्यमातून त्या अनेक समाज माध्यमामध्ये महिला अत्याचार व सबलीकरण यावर लेख कविता लिहितात. राष्ट्रीय सरपंच संसदेची महिलांच्या सहभागातून ग्रामविकासाची संकल्पना राबवण्यासाठी त्या कार्यरत असून त्यांच्या निवडीबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचे अभिनंदन होत आहे.





जेजुरी खंडोबा देवाचा गाभारा दुरुस्ती करिता दीड महिना बंद ठेवण्यात येणार असल्याचे समजताच भविक पर्यटकांनी रविवारी मंदिरावर गर्दी कैली होती.
छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे )

## बावरीया टोळीच्या तीन जणांना अटक; तीन दिवसांची वन कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सावली वनपरिक्षेत्रात वाघाची शिकार केल्याप्रकरणी सावली येथे वेगळा स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व आरोपींना आज सावली न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने रूमाली बावरीया, राजू सिंग व सोनू सिंग या तीन आरोपींना तीन दिवसांची वन कोठडी ठोठावली आहे. विशेष म्हणजे या सर्व आरोपींना यापूर्वीच आसाम राज्यातील गुवाहटी येथून वन विभागाने अटक केली होती. वाघांच्या शिकारीची टोळी देशपातळीवर सक्रिय आहे. या शिकार प्रकरणात आतापर्यंत १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या शिकार प्रकरणाच्या तपासाकरीता वनविभागाने स्पेशल टास्क फोर्स गठीत केली आहे. या टास्क फोर्समध्ये वन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या शिकारी टोळीने गडचिरोली तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील सावली वनपरिक्षेत्रात पट्टेदार वाघाची शिकार केल्याचे समोर आले होते. आसाम राज्यातील गुवाहटी येथे आरोपींना अटक केल्यानंतर तेलंगाणा राज्यातील करीमनगर येथून काही आरोपींना अटक केली होती. या आरोपींकडूनच सावली येथील शिकार प्रकरण समोर आले. त्यानंतर या आरोपींवर सावली येथे वाघाच्या शिकार प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. या सर्व आरोपींना मंगळवार २९ ऑगस्ट रोजी सावली न्यायालयात हजर केले होते. न्यायालयाने यातील रूमाली बावरीया, राजू सिंग व सोनू सिंग या तीन आरोपींना वन कोठडी ठोठावली आहे. या प्रकरणाचा तपास चंद्रपूर वनविभागाची चमू व विशेष कृती दल यांच्याद्वारे करण्यात येत आहे. आजपर्यंत वाघ शिकार प्रकरणात १९ आरोपींचा समावेश दिसून आला असून देशपातळीवरदेखील आणखी काही आरोपी असल्याची शक्यता आहे.



## वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीत वेरुळ येथे स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जिल्हा परिषद औरंगाबादचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विकास मिना व मा उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता श्री राजेंद्र देसले यांच्या आदेशानुसार तसेच पंचायत समिती खुलताबाद येथिल मा गट विकास अधिकारी प्रकाश नाईक व मा विस्तार अधिकारी पं श्री हरकचंद कहाटे यांच्या मार्गदर्शनाखाली मैजे वेरुळ येथिल १२ वे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर भगवान येथिल पहिला श्रावण सोमवारचा मुहुर्तावर स्वच्छता मोहिम व जनजागृती अभियानास सुरुवात करण्यात आली त्यामुळे परीसरात धार्मिकतेसह स्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कार्यासाठी श्रावण मासातील पहिल्या सोमवारी (२१/०८/२०२३) संत जनार्दन स्वामी गुरुकुल विद्यालय वेरुळ येथिल स्वयमसेवक म्हणुन १६ विद्यार्थी, मुख्यध्यापक दिनकर ढोबळे व शिक्षक सुनिल कोटकर यांनी सहकार्य केले. श्रावण मासातील दुसरा सोमवार (२८/०८/२०२३) रोजी स्वच्छता मोहीम व जन जागृती करीता ENHANCE समंत भद्र विद्यामंदिर वेरुळ येथिल स्वयमसेवक म्हणुन १६ विद्यार्थी, मुख्यध्यापक श्री गुलाबचंद बोराळकर, शिक्षक श्री अशिश कानेड यांनी सहकार्य केले. या कामी उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणीपुरवठा व स्वच्छता राजेंद्र देसले, विस्तार अधिकारी आरोग्य शशिकांत ससाणे, स्वच्छता कक्षाचे ग्रामविकास अधिकारीराजेंद्र दांडेकर, ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घरमोडे, उपसरपंच विजय राठोड, माजी सरपंच प्रकाश पाटील, माजी सरपंच साहेबराव पांडव, सदस्य चंदु राठोड, ग्रामपंचायत कर्मचारी राजेश आडे, मो. नईमोद्दीन हे हजर होते. घृष्णेश्वर मंदिर परिसरात दिवसन दिवस स्वच्छतेत भर पडत असुन सातत्य टिकून राहत आहे. या बाबतीत देसले यांनी समाधान व्यक्त केले ग्रामपंचायत वेरुळ व सर्व नागरीक, व्यापारी, उपक्रमात सहभागी असलेल्या कर्मचारी, विदयार्थी यांचे या उपक्रमाकरीता शुभेच्छा देऊन गौरवण्यात आले. आभार व्यक्त केले. या मोहिम यशस्वी कारसाठी विस्तार अधिकारी शशिकांत ससाणे, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र दांडेकर, ग्रामविकास स्वप्नील घरमोडे, राजेश आडे, मो. नईमोद्दीन यांनी प्रयत्न केले.

## अंबाबाई देवीचे दर्शन गाभाऱ्यातून सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक प्रमुख पीठ असलेल्या करवीर निवासिनी अंबाबाईचे दर्शन आजपासून गाभाऱ्यात जाऊन पुन्हा एकदा घेता येऊ लागले आहे. राखी पौर्णिमेच्या या भेटीमुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे दर्शन गर्दीचे दिवस वगळता पुन्हा पितळी उंबऱ्याच्या आतून घेता येणार असल्याची घोषणा पालकमंत्री दीपक केसरकर यांनी दोन दिवसांपूर्वी केली होती. आज बुधवारपासूनच या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली. करोनाच्या काळात भाविकांना गाभाऱ्यातून दर्शन बंद करून पितळी उंबऱ्यापासून दर्शन दिले जाऊ लागले होते. त्यानंतरही हा निर्णय कायम ठेवण्यात आला होता. अशा दर्शनामुळे भाविकांना समाधान मिळत नव्हते, त्यामुळे त्यांनी



पितळी उंबऱ्याच्या आतून दर्शनाची मागणी चालवली होती. दरम्यान, आज सकाळपासून भाविकांना गाभाऱ्यातून दर्शनाला प्रारंभ झाला आहे. पालकमंत्री केसरकर यांनी गर्दीचे दिवस वगळता पितळी उंबऱ्याच्या आतून दर्शन मिळणार असल्याचे विधान केले आहे. गर्दीचे दिवस म्हणजे नेमके कोणते, याबाबत स्पष्टता द्यावी लागणार आहे. त्यामुळे संभ्रमावस्था कायम राहिली आहे. अचानक भाविकांची गर्दी वाढल्याने पितळी उंबऱ्याच्या आतून दर्शन सुविधा मिळाली नाही तर वादाचे प्रकार घडण्याची चिन्हे आहेत. सकाळी पावणेपाच वाजता देवीचा दरवाजा उघडल्यापासून भाविकांना पितळी दरवाजातून दर्शन सुरू केले आहे. भाविक शिस्तबद्धपणे दर्शन घेत आहेत, असे देवस्थान समितीचे व्यवस्थापक महादेव दिंडे यांनी सांगितले.



## ग्रा.पं.कडून जि.प. शाळेला विविध वस्तू भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लोणी येथील ग्रामपंचायत अंतर्गत येथील जिल्हा परिषद शाळेला विविध वस्तू भेट देण्यात आली. लोणी ग्रामपंचायतकडून पंधरावा वित्तीय आयोग योजनेतून जिल्हा परीषद प्रथामिक शाळा लोणी येथे सूमारे अंशी हजार रूपयांचे संगणक वाटप करण्यात आले. लोणी तालुका खूलताबाद येथे लोणी ग्राम पंचायत तर्फे पंधरावा वीत्तीय आयोग योजनेतुन जिल्हा परीषद प्रथामिक शाळा व धामनी वस्ती शाळेला तब्बल अंशी हजार रुपयेचे डीजीटल टी.व्ही. संच संगणक संच झेराक्स मशिन आदी विविध साहीत्य लोकनियूक्त सरपंच गुलशनबी सत्तार पटेल यांच्याहस्ते शाळे चे मूख्यध्यापक वाघमारे सर यानां सुपूर्द करणत आले. यावेळी भाजपा अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तथा तंटामुक्त अध्यक्ष सत्तार शब्बीर पटेल, माजी उप सरपंच सत्तार सूभान पटेल, उपसरपंच पती बळीराम दांडेकर, ग्राम विकास अधिकारी प्रशांत वाघमारे, ग्राम पंचायत सदस्य मोईन पटेल, कैसर पटेल, रूबिना सांडू पटेल, शालेय व्यस्थापन समीतीचे ध्यक्ष भब्बू पटेल, गूलाबनबी पटेल, धामनी वस्तीचे मूख्यध्यापक गणेश सर पठाण, अन्सार शेख काजी, चहूरे सर यांच्या सह शीक्षक ग्रा.पं. शिपाई तसेच गावातील नागरिक व तरूण मंडळ उपस्थित होते.

## आ. जोरगेवारांचा कौशल्य विकासावर जोर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मेक इन ईंडिया , कौशल्य विकासाच्या माध्यमातून



आत्मनिर्भर भारताची हाक देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. देशपातळीवर यादृष्टिकोनातून सर्वच पातळ्यांवर विविध विभागाअंतर्गत प्रयत्नही सुरु झालेत. आणि आज मोठ्या प्रमाणात युवावर्गासह महिला पुरुष देखील प्रशिक्षण घेत आहेत. चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनीही यंग चांदा ब्रिगेड या संस्थेच्या माध्यमातून आपल्या मतदारसंघातील महिला वर्गाला कौशल्य विकासाच्या माध्यमातून आत्मनिर्भर करण्याचा संकल्प केलाय. याच संकल्पनेतून त्यांनी गेल्या सहा महिन्यांत आजवर 1200 हून अधिक महिलांना ब्युटी पार्लर प्रशिक्षण व शिलाई मशीन प्रशिक्षण दिले असून अजूनही ठिकठिकाणी हे प्रशिक्षण सुरु आहेत. विशेष म्हणजे हे सर्व प्रशिक्षण हे मोफत देण्यात येत असून प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थांना प्रमाणपत्र ही देण्यात येत आहेत. महिलांनी स्वयंरोजगारातून आत्मनिर्भर व्हावे व स्वतःचा रोजगार सुरु करून आपल्या कुटुंबाला हातभार लावावा यासाठी यंग चांदा ब्रिगेड च्या माध्यमातून तज्ञ प्रशिक्षक प्रशिक्षण देत असून प्रात्यक्षिकांसह योग्य मार्गदर्शन देखील करण्यात येत आहे. आपल्या मतदारसंघात ज्या ज्या महिलांना हे प्रशिक्षण घ्यायचे आहे त्यांना त्यांच्याच घराच्या जवळपास हे प्रशिक्षण केंद्र उपलब्ध व्हावे यासाठी आमदार जोरगेवार यांच्या मार्गदर्शनात यंग चांदा ब्रिगेड ची महिला संघटना अथक परिश्रम घेत आहेत. लवकरच हे प्रशिक्षण मतदारसंघातील ग्रामीण भागात देखील सुरु होतील या दृष्टिकोनातूनही प्रयत्न सुरु झाले असून आता ग्रामीण भागातील महिलांनाही कौशल्य विकासातून आत्मनिर्भर व्हायचे धडे देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुद्धा करण्यात येईल असे आमदार किशोर जोरगेवार यांनी आपले मत व्यक्त केले. यासोबतच अम्मा का टिफीन च्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी मतदारसंघातील निराधार, निराश्रित वृद्धांना सुद्धा पोटभर जेवणाची सोय व्हावी म्हणून सेवा सुरु केली आहे. यामाध्यमातून निराधार व निराश्रित वृदाधांना त्यांच्या घरी अम्मा का टिफीन नेऊन देण्यात येतो. याचाही लाभ आज मतदारसंघातील अनेक वृद्ध घेत आहेत.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पुस्तकाच्या पानापानांत बाप दिसला पाहिजे : प्रा.वसंत हंकारे

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र गायकवाड**

**बिडकिन :** तुमच्या जीवनाची वाट लावणाऱ्या संधीसाधूंपासून सावध राहिले तर बापाला समाजात मान खाली घालण्याची वेळ येणार नाही. अभ्यास करताना पुस्तकाच्या पानापानांत आपला बापच दिसला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. वसंत हंकारे यांनी केले आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व रक्षाबंधन निमित्त आनंदेश्वरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व वरद हॉस्पिटल ॲण्ड आय सी यु यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात व्याख्याते प्रा.हंकारे बोलत होते. यावेळी बोलताना प्रा. हंकारे म्हणाले की, २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानामुळे आपण अख्खे जग मुठीत घेतले. पण आपणास जग दाखवणारे जन्मदाते आई, वडीलही समजत नाही, हे मोठ दुर्दैव आहे. आयुष्यात आपल्यामुळे आई, वडिलांना मान खाली घालण्याची वेळ येऊ देवू नका, असे आवाहन त्यांनी केले. महिना दोन महिन्यांच्या ओळखीतून थोड्या कालावधीसाठी कुणीतरी खोट्या प्रेमाच्या नावाखाली आयुष्यात येतो. आपण आईवडिलांचा विचार न करता केवळ दोन दिवसांची ओळख झालेल्या हूल्लड पोरांचा हात धरुन निघुन जाता.याबाबत उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची कान उघाडणी केली.याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ, तहसीलदार सारंग चव्हाण, गट शिक्षणाधिकारी प्रकाश लोखंडे. सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश सुरवसे, नाथ मंदिर विश्वस्त विठ्ठल शास्त्री चनघटे , सरपंच अशोक धर्मे , तालुका प्रमुख मनोज पेरे, युवासेना जिल्हा प्रमुख काकासाहेब टेके , स्वराज्य पतसंस्था अध्यक्ष सर्जेराव जाधव, भाजपा पदाधिकारी तमिजोद्दीन इनामदार, लोकनेते विनायकराव मेटे सहकारी सुत गिरणी संचालक कडुबाळ फासाटे, मुख्याध्यापक संभाजी जाधव आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आनंदेश्वरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा लोकनेते विनायकराव मेटे सहकारी सुत गिरणीचे अध्यक्ष विजय शेजुळ, वरद हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुरेश जंगले, श्री



स.भु विद्यालयाचे अध्यक्ष नंदकुमार वैद्य, लोकनेते विनायकराव मेटे सहकारी सुत गिरणीचे संचालक विष्णू जाधव, पत्रकार हसन चाऊस, रविंद्र गायकवाड, ज्ञानेश्वर बोरुडे,प्रविण चव्हाण , सचिन हाडे, ज्ञानेश्वर औटी, एकनाथ हिवाळे , मोतीराम जाधव, कल्याण शिंदे, प्रदीप चव्हाण, कारभारी सोनवणे, विकास गोर्डे , प्रा.नितिन आहेर , आदींसह विद्यार्थी, महिला पालक शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकुमार वैद्य, सुत्रसंचलन प्राचार्य डॉ युसुफ पठाण तर ज्ञानेश्वर औटी यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरविंद शेजुळ, पार्थ फासाटे, तुषार हाडे, कुणाल जाधव , अशोक बोबडे, मंदार आगाज , राम कुऱ्हाळ, आप्पासाहेब ठाणगे, तेजस गव्हाणे, ओम मराठे , नवनाथ मोगल , रोहित कांबळे, शुभम चव्हाण, नारायण पाचे, अजिंक्य जाधव, आदींनी परिश्रम घेतले.



## राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत सिंदफणा स्कूलला उपविजेतेपद

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिंदफणा पब्लिक स्कूलच्या २१ वर्षाखालील गटातील मुलांच्या बास्केटबॉल संघाने रोहतक येथे झालेल्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पूर्वसंध्येला मिळालेल्या या विजेतेपदाबद्दल सिंदफणा पब्लिक स्कूल वर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, युथ गेम्स काऊन्सिल तर्फे रोहतक हरियाणा येथे २५,२६ आणि २७ ऑगस्ट दरम्यान तिसऱ्या राष्ट्रीय युथ गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भारतातून विविध राज्यातील संघांनी सहभाग नोंदविला. सिंदफणा शाळेच्या संघाने प्राथमिक गटात उत्तरप्रदेश संघाला नमविले. त्यानंतर उपांत्य फेरीत हरियाणा संघाला 26-19 गुण या फरकाने हरवत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. परंतु अंतिम सामन्यात शाळेच्या संघाला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेच्या तयारीसाठी शाळेचे क्रीडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, सचिन मंजुळे व क्रीडा शिक्षिका वैशाली सोळंके यांनी परिश्रम घेतले. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, शाळेच्या सचिव मंगल सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## युवकांनी विवेकानंदांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले ध्येय साध्य करावे : सुजाता दळवी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आज अनेक यशस्वी व्यक्तींचे जिवन चरित्र आपण पाहतो तेव्हा अनेकांनी विवेकानंद यांच्यापासून प्रेरणा घेत मोठे ध्येय गाठले आहे आसे दिसते. तेव्हा महाविद्यालयीन जीवनातच स्वामी विवेकानंद यांना जाणून घ्या , त्यांच्या लहान लहान गोष्टीतून प्रेरणा घेऊन आपलं जीवनातील काही वेळ समाजासाठी ,राष्ट्रासाठी द्या अस आवाहन विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी, महाराष्ट्र प्रांत संघटक सुजाताताई दळवी यांनी केले. छत्रपती शाहूमहाराज शिक्षण संस्था , बोखारा ,नागपूर द्वारा संचालित रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालय येथे युवा नेतृत्व विकसन शिबीर 2023 च्या माहीतीस्तव आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या संचालक तथा सरस्वती महाविद्यालय च्या प्राचार्य सौ.लता वाघ, महाराष्ट्र प्रांत संघटक सुजाता दळवी , विदर्भ प्रमुख भरत जोशी , युवा नेतृत्व विकसन शिबीर प्रमुख आसावरी कुळकर्णी आधुनिक केसरी चे चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी, तथा मोटिव्हेशनल ट्रेनर शाम हेडाऊ आदींची उपस्थिती होती.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारे अतिशय नियोजनबद्ध आणि सूत्रबद्ध पद्धतीने आयोजित या कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. तर संगित विभाग प्रमुख प्रा देशमुख यांनी विवेकानंदांवरील गीताने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

यावेळी पुढे बोलतांना सुजाता दळवी यांनी विवेकानंदांवरील अनेक प्रेरक प्रसंग विद्यार्थ्यांना सांगत युवा नेतृत्व विकसन शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले. आधुनिक केसरीचे चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी प्रा. शाम हेडाऊ यांनी समाजातील प्रत्येक क्षेत्रात आज संस्कारक्षम असे नेतृत्व निर्माण होणे आवश्यक असून विवेकानंद केंद्र कन्याकुमारीच्या युवा नेतृत्व विकसन शिबिराच्या माध्यमातून होत असलेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांनसह प्राध्यापकांनीही सहभागी व्हावे असे आवाहन केले. राष्ट्राच्या पुनर्निर्माणात हे नेतृत्व मोलाची भूमिका पार पाडेल असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. आसावरी कुळकर्णी यांनी शिबिराबाबत संपूर्ण माहीती दिली. मराठी विभाग प्रमुख तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे यांच्या उत्स्फूर्त अशा सूत्रसंचालनाने बहरलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे आभार प्रा. पातोडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे यांच्यासह सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तथा विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.





गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर